
# मराठी

# सुलभभारती

## इयत्ता सातवी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.


(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.



## ओळखा पाहू!

**मुलांनो, आज आपण एक छान खेळ खेळणार आहोत. तुम्हांला मी कोण आहे? ते ओळखायचे आहे. त्यासाठी तुम्हांला येथे काही मुद्दे दिले आहेत, ते वाचा व मी कोण ते चौकटीत लिहा.**

(अ) (१) मी आकाशात राहतो.
(२) मी तुम्हांला 'ड' जीवनसत्त्व देतो.
(३) माझ्याकडे एकटक पाहू नका.

(आ) (१) मी मीठू मीठू बोलतो.
(२) तुमची करमणूक करतो.
(३) मला पिंजऱ्यात कोंडू नका.

(इ) (१) मी सगळ्यांशी संवाद साधतो.
(२) तुमचा संदेश झटपट पोहोचवतो.
(३) रात्री झोपताना मला खिशात ठेवू नका.

(ई) (१) मी गोल आहे.
(२) तुम्ही माझ्याबरोबर खेळू शकता.
(३) माझ्यामुळे इतर लोकांच्या खिडक्या फुटणार नाहीत याची काळजी घ्या.

(उ) (१) सगळ्यांना माझे वेड आहे.
(२) करमणुकीबरोबर ज्ञानही देतो.
(३) माझ्यासमोर तास न् तास बसू नका.

(ऊ) (१) मी गोलाकार, पिवळसर आहे.
(२) सरबत करताना माझा उपयोग होतो.
(३) खोकला येत असेल तर मला खाऊ नका.

(ए) (१) मी रात्री आकाशात दिसतो.
(२) लहान मुले मला मामा म्हणतात.
(३) माझा आकार रोज बदलतो.

(ऐ) (१) मी हिरवा आणि तपकिरी आहे.
(२) मी तुम्हांला फळे आणि फुले देतो.
(३) मला तोडू नका.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून याप्रमाणे विविध प्रकारची शाब्दिक कोडी सोडवून घ्यावी.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# सुलभभारती

## इयत्ता सातवी

(हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी.)



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

CND7U4

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
चौथे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ
(सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**प्रकाशक :**
**श्री विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**संयोजन :**
श्रीमती सविता अनिल वायळ, विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार / मुखपृष्ठ :** फारुख नदाफ

**निर्मिती :**
श्री सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री संदीप आजगांवकर, निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :** भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**कागद** : ७० जीएसएम, क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश** :N/PB/2021-22/
**मुद्रक** :M/s

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

तुम्हां सर्वांचे इयत्ता सातवीच्या वर्गात स्वागत आहे. यापूर्वीच्या वर्गांत मराठी सुलभभारती हे पाठ्यपुस्तक तुम्ही अभ्यासले आहे. इयत्ता सातवीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला अभ्यासायला देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. इतरांशी संवाद साधण्यासाठी, आपले विचार, भावभावना व्यक्त करण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणावर मराठी भाषेचा वापर करतो. मराठी भाषेतून चांगला संवाद साधता येण्यासाठी, आपली शब्दसंपत्तीही चांगली हवी. या पाठ्यपुस्तकातील कथा, संवाद, पाठ, कविता, गीते वाचून तुम्हांला नवनवीन शब्द शिकायला मिळणार आहेत. हे पुस्तक वाचून, वापरून तुम्हांला मराठी भाषेची गोडी लागावी असे आम्हांला वाटते.

पाठ्यपुस्तकात तुम्हांला आवडतील अशी शब्दकोडी आणि 'वाचा', 'चर्चा करा, सांगा', 'खेळ खेळूया' अशा अनेक कृती दिल्या आहेत. तसेच व्याकरण घटकांची सोप्या रीतीने ओळख करून दिली आहे. शिवाय तुमच्या नवनिर्मितीबद्दल बोलण्याची, लिहिण्याची संधीही तुम्हांला मिळणार आहे. तुम्हांला संगणक, मोबाईल सहजपणे हाताळता येतो. या तंत्रज्ञानाचा अभ्यासासाठी उपयोग व्हावा यादृष्टीनेही काही कृती करण्यासाठी दिल्या आहेत. मराठी भाषा शिकत असताना त्यातून काही मूल्ये शिकणे, सामाजिक समस्या जाणून घेणे, त्या सोडवण्यासाठी तत्पर राहायला शिकणे हेही महत्त्वाचे आहे. या दृष्टीनेही या पाठ्यपुस्तकातील पाठ, कृती, स्वाध्याय यांचा विचार करा.

हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडले का, ते आम्हांला कळवा. तुम्ही दैनंदिन जीवनात आणि पुढील आयुष्यात मराठीचा नक्कीच प्रभावीपणे वापर कराल, होय ना?

तुम्हां सर्वांना शुभेच्छा!

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ मार्च, २०१७, गुढीपाडवा
भारतीय सौर : ७ चैत्र १९३९

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : द्‌वितीय भाषा मराठी सातवी

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्‌यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>➢ आपल्या भाषेत बोलण्याची तसेच चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ सक्रिय आणि जागरूक असण्यासाठी तयार केले जाणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्र, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची आणि चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ गटात कार्य करताना आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे–घेणे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ मराठीबरोबरच आपल्या भाषेतील साहित्य वाचण्याची तसेच लिहिण्याची सुविधा आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ आपल्या परिवाराशी आणि समाजाशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ आपली भाषा वाचत असताना लिहिण्यासंदर्भात क्रियाही आयोजित कराव्यात.<br>उदा., शब्दखेळ, शब्दकोडी.<br>➢ मराठी भाषेमधील संदर्भाला अनुसरून भाषेचे विश्लेषण (व्याकरण, वाक्यरचना, विरामचिन्हे इत्यादी.) करण्याची संधी दिली जावी.<br>➢ कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास करण्याच्या क्रिया उदा., अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित लिखित साहित्य आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>➢ साहित्य आणि साहित्यिक तत्त्वांची समज वाढण्याची संधी दिली जावी. | 07.16.01 पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा., स्थानिक सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात.<br>07.16.02 पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्‌दे स्वत:च्या भाषेत कथन करतात, लिहितात.<br>07.16.03 रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांद्‌वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वत:च्या शब्दांत मांडतात. तसेच यांचा वापर करून अधिकची माहिती मिळवतात.<br>07.16.04 इतरांनी सांगितलेले व अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात, सांगतात.<br>उदा., बसस्थानक, रेल्वेस्थानक इत्यादी.<br>07.16.05 विविध प्रसारमाध्यमांद्‌वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या, चर्चा व संवाद समजपूर्वक ऐकतात.<br>07.16.06 सार्वजनिक ठिकाणांवरील सूचना समजपूर्वक ऐकतात.<br>07.16.07 विविध विषयांसाठी, विविध उद्‌देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.<br>07.16.08 वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्‌देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.<br>07.16.09 पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी) इत्यादी लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात. त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.<br>07.16.10 आवडलेली कथा, विनोद, कविता यांचे साभिनय सादरीकरण करतात.<br>07.16.11 कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह–अवरोहासह आनंददायी पद्‌धतीने म्हणतात.<br>07.16.12 वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.<br>07.16.13 सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.<br>07.16.14 घरी व परिसरात घडणारे अनौपचारिक संभाषण समजपूर्वक ऐकतात.<br>07.16.15 मोठ्या माणसांच्या संवादात, मित्रांच्या गटचर्चेत सहभागी होऊन आपले मत सुस्पष्टपणे मांडतात. |

| | |
|---|---|
| ➢ शब्दकोशाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.<br>➢ भाषा समृद्धीसाठी बालसाहित्याबरोबरच इतर साहित्याचा संग्रह करणे व त्याचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिसरातील विविध ठिकाणे, भेटणाऱ्या व्यक्ती यांबाबत विचार मांडण्याची संधी दिली जावी. | 07.16.16 दिलेल्या शब्दांचा, शब्दसमूहांचा, म्हणी व वाक्प्रचारांचा जीवनव्यवहारात उपयोग करतात, त्यांचा संग्रह करतात.<br>07.16.17 योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करतात.<br>07.16.18 भाषिक खेळासंदर्भात माहिती सांगतात.<br>07.16.19 घर, शाळा, समाज व परिसर यांमध्ये होणाऱ्या उपक्रमात सहभागी होतात.<br>07.16.20 दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून योग्य शीर्षक देतात.<br>07.16.21 दिलेल्या विषयांवर प्रश्नावली तयार करून लिहितात.<br>07.16.22 परिसरातील सामाजिक समस्यांची जाणीव निर्माण होऊन त्याबाबत योग्य विचार मांडतात<br>07.16.23 विनोद वाचून त्याचा आनंद घेतात.<br>07.16.24 लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवतात.<br>07.16.25 परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.<br>07.16.26 चित्र/प्रसंग वर्णन स्वत:च्या शब्दांत लिहितात.<br>07.16.27 सुविचार, संदेश, कथा परिपाठात सादर करतात.<br>07.16.28 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. उदा., क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये, केवलप्रयोगी अव्यये, अर्धविराम, संयोगचिन्ह, अपसरणचिन्ह व शुद्धलेखनाचे नियम<br>07.16.29 शब्दकोश अकारविल्ह्यानुसार पाहतात. |

## शिक्षकांसाठी

**मराठी सुलभभारती इयत्ता सातवी हे पाठ्यपुस्तक अध्यापनासाठी आपणांस देताना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ, कविता, गीते, कृती, संवाद, स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. तसेच व्याकरण घटकांची मनोरंजक, सोप्या व कार्यात्मक पद्धतीने मांडणी केली आहे. वैविध्यपूर्ण शीर्षकांखाली काही कृती दिलेल्या आहेत या कृतींतून विद्यार्थ्यांमधील निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यास वाव मिळणार आहे. हे सर्व घटक शिकवत असताना पाठ्यघटक कसे हाताळावे याबाबत आपणांस अनेक ठिकाणी मार्गदर्शनपर सूचना दिलेल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे.**

**मराठी सुलभभारती इयत्ता सातवी हे पाठ्यपुस्तक आपणांस आवडेल, अशी आशा आहे.**

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रार्थना | जगदीश खेबूडकर | १ |
| २. | श्यामचे बंधुप्रेम | सानेगुरुजी | २ |
| ३. | माझ्या अंगणात (कविता) | ज्ञानेश्वर कोळी | ७ |
| ४. | गोपाळचे शौर्य | लक्ष्मीकमल गेडाम | १० |
| ५. | दादास पत्र | -- | १५ |
| | • आम्ही सूचनाफलक वाचतो. | -- | १७ |
| ६. | टप् टप् पडती (कविता) | मंगेश पाडगांवकर | १८ |
| ७. | आजारी पडण्याचा प्रयोग | द. मा. मिरासदार | २१ |
| | • आपली समस्या आपले उपाय–१ | -- | २६ |
| | • आम्ही जाहिरात वाचतो. | -- | २७ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ८. | शब्दांचे घर (कविता) | कल्याण इनामदार | २८ |
| ९. | वाचनाचे वेड | आशा पाटील | ३१ |
| | • आम्ही बातमी वाचतो. | -- | ३५ |
| १०. | पंडिता रमाबाई | डॉ. अनुपमा उजगरे | ३६ |
| ११. | लेक (कविता) | अस्मिता जोगदंड–चांदणे | ४० |
| | • आपली समस्या आपले उपाय–२ | -- | ४३ |
| १२. | रोजनिशी | -- | ४४ |
| १३. | अदलाबदल | पन्नालाल पटेल | ४७ |
| १४. | संतवाणी | संत जनाबाई, संत तुकाराम | ५२ |

# १. प्रार्थना

● ऐका. वाचा. म्हणा.

नमस्कार माझा या ज्ञानमंदिरा ।
सत्यम् शिवम् सुंदरा ।।

शब्दरूप शक्ती दे
भावरूप भक्ती दे
प्रगतीचे पंख दे चिमणपाखरा ।।१।।

विद्याधन दे अम्हांस
एक छंद, एक ध्यास
नाव नेई पैलतीरी दयासागरा ।।२।।

होऊ आम्ही नीतिमंत
कलागुणी बुद्धिमंत
कीर्तिचा कळस जाय उंच अंबरा ।।३।।



**जगदीश खेबूडकर** (१९३२–२०११) : प्रसिद्ध मराठी साहित्यिक, गीतकार. मराठी चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर गीतांचे लेखन केले आहे. विविध कथा व नाटके प्रसिद्ध.

प्रस्तुत प्रार्थनेतून शाळेविषयी प्रेम, जिव्हाळा व कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून गटांत तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरांत, साभिनय म्हणून घ्यावे. विद्यार्थ्यांना गाणे, समूहगीते यांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

# २. श्यामचे बंधुप्रेम

**सानेगुरुजी– पांडुरंग सदाशिव साने** (१८९९–१९५०) : सानेगुरुजींनी कथा, कविता, कादंबऱ्या असे विपुल ललित लेखन, तसेच वैचारिक लेखन केलेले आहे. 'श्यामची आई', 'धडपडणारी मुले', 'भारतीय संस्कृती', 'गोड गोष्टी', 'सुंदर पत्रे' इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'श्यामची आई' या पुस्तकातून हा पाठ घेतलेला आहे.

श्यामच्या मनात आपल्या लहान भावंडाविषयी असलेला जिव्हाळा व प्रेम, तसेच आईने मुलांना दिलेली शिकवण याचे हृदयस्पर्शी वर्णन प्रस्तुत पाठात आले आहे.

मे महिन्याची सुट्टी संपून मी परत दापोलीस शिकावयास गेलो. शाळा सुरू झाली. पावसाळाही सुरू झाला. तप्त जमिनीला मेघ शांतवू लागले. तापलेल्या जमिनीवर पाणी पडे व कसा सुंदर वास सुटे. नवीनच पाऊस जेव्हा सुरू होतो, तेव्हा मातीचा एक रम्य सुंदर वास सुटत असतो. 'गंधवती पृथ्वी' या वचनाची त्या वेळेस आठवण येते. फुलाफळांत जो रस, जो गंध असतो, एक प्रकारचा स्वाद असतो तो पृथ्वीच्याच पोटातला.

घरून दापोलीस येताना या वेळेस मी एक निश्चय करून आलो होतो. सुट्टीत घरी असताना एके दिवशी लहान भाऊ नवीन सदऱ्यासाठी हट्ट धरून बसला होता. त्या वेळेस त्याची समजूत घालताना आई म्हणाली, ''तुझे अण्णा–दादा मोठे होतील, रोजगारी होतील, मग तुला सहा महिन्यांनी नवीन सदरा शिवतील. आता नको हट्ट धरू.'' मित्रांनो, माझ्या लहानपणी कपड्यांचे बंड फार माजले नव्हते. आम्हांला कोट माहीतच नव्हता. कित्येकदा सदराही वर्षा–दोन वर्षांनी नवीन मिळावयाचा. थंडीच्या दिवसांत धोतर चौघडी करून गळ्याशी बांधून शाळेत जावयाचे. मफलर नव्हते, जाकिटे नव्हती, गरम कोट नव्हते.

माझ्या धाकट्या भावाचा सदरा फाटला होता. आईने त्याला दोन–तीन गाबड्या लावल्या होत्या. आपल्या भावास नवीन कपडा शिवून न्यावयाचा, असे मी ठरवून आलो होतो; परंतु पैसे कोठून आणावयाचे?

माझे वडील कोर्ट–कचेरीच्या कामास दापोलीस येत. वडील दापोलीस आले म्हणजे आणा–दोन आणे मला खाऊला म्हणून देऊन जायचे. खाऊच्या पैशांतील एक पैसाही खाऊमध्ये न खर्चण्याचे मी ठरवले. ज्येष्ठात आमची शाळा सुरू झाली. गणेश चतुर्थीला तीन महिने होते. तेवढ्या महिन्यांत या खाऊच्या पैशांचा रुपयाभर जमला असता. गणेश चतुर्थीस धाकट्या भावास कोट किंवा सदरा शिवून न्यावयाचा, असे मी मनात निश्चित केले.

ध्येयावर डोळे होते. रोज पैसे मोजत होतो. गणेश चतुर्थी जवळ येत चालली. मजजवळ एक रुपया दोन आणे जमले होते. गौरी–गणपतीला नवीन कपडे करतात. आपल्या गावातील मुलांना त्यांचे आईबाप नवीन कपडे शिवतील; परंतु माझ्या भावास कोण शिवील? माझ्या भावाला मी शिवून देईन.

मी शिंप्याकडे गेलो. माझ्या भावाच्या वयाचा एक मुलगा मी बरोबर घेऊन गेलो. त्याच्या अंगाचा कोट शिवावयास मी सांगितले. दोन वार कापड घेतले. अर्धा वार अस्तर घेतले. कोट तयार झाला. जवळच्या पैशांत सारा खर्च भागला. तो कोट हातात घेतला, तेव्हा माझे डोळे अश्रूंनी न्हाले होते.

मी घरी जाण्यास निघालो. मी ज्यांच्याकडे राहिलो होतो ते म्हणाले, ''पावसापाण्याचा जाऊ नकोस. नदीनाल्यांना पूर आले असतील. पिसईचा पऱ्ह्या, सोंडेघरचा पऱ्ह्या यांना उतार नसेल, आमचे ऐक''.

**शिक्षकांसाठी :** वरील कथेतील प्रसंगासारख्या एखाद्या प्रसंगावर विद्यार्थ्यांना गटात चर्चा करायला लावावी. त्यांना आपले अनुभव सांगण्यासाठी प्रवृत्त करावे.

मी कोणाचे ऐकले नाही. हृदयात प्रेमपूर आला होता, तो नदीनाल्यास थोडीच भीक घालणार!

नवीन कोट बांधून घेऊन मी निघालो. पंख असते तर एकदम उडून गेलो असतो. चालण्याचे श्रमच वाटत नव्हते. सुखस्वप्नात दंग होतो. आईला किती आनंद होईल, या कल्पनेत मी होतो. एक नानेटी माझ्या पायाजवळून उडी मारून गेली. नानेटी म्हणून एक सापाचा प्रकार आहे. तिचा हिरवा रंग असतो. नानेटी उड्या मारत जाते. मला जरा भीती वाटली. जपून चालू लागलो. पिसईचा पऱ्ह्या दुथडी भरून वाहत होता. त्याच्या पाण्याला ओढ फार. काय करायचे? आईचे नाव घेतले व शिरलो पाण्यात. हातात काठी होती. पुढे काठी टाकावयाची व मग पाऊल टाकावयाचे. मी वाहून जाण्याच्या बेतात होतो; परंतु कसाबसा बाहेर आलो. इतर नदीनाल्यांना प्रेमाने भेटावयास जाणारा तो नाला! तो मला कसा बुडवील? मी माझ्या भावास भेटावयास जात होतो. त्या नाल्याइतकाच उत्सुक होतो, धावपळ करीत होतो. त्या नाल्याप्रमाणेच मीही हृदय भरून घेऊन जात होतो.

रस्त्यातील खडी वर आली होती. सुयांसारखे दगड पायांना खुपत होते; परंतु माझे तिकडे लक्ष नव्हते. अंधार होण्यापूर्वीच घरी जाण्याची धडपड चालली होती; परंतु वाटेतच अंधार पडला. कडाड् कडाड् आवाज गरजत होते. विजा चमचम करत होत्या. खळखळ पाणी वाहत होते. त्या पंचमहाभूतांच्या नाचातून मी चाललो होतो.

शेवटी एकदाचा मी घरी आलो. ओलाचिंब होऊन गेलो होतो. 'आई!' मी बाहेरून हाक मारली. हवेत फार गारठा आलेला होता. वडील संध्या करत होते व आईने शेगडीत निखारे शेकण्यासाठी दिले होते.

'अण्णा आला, आई, अण्णा,' धाकट्या भावाने दार उघडले. दोघे लहान भाऊ भेटले.

''इतक्या पावसातून श्याम कशाला आलास? सारा भिजलास ना?'' आई विचारू लागली.

''सोंडेघरच्या पऱ्ह्याला पाणी नव्हते का रे?'' वडिलांनी विचारले.

''हो. परंतु मी आलो कसातरी!'' मी म्हटले.

''त्या दिवशी एक बाई वाहून गेली हो त्यातून.'' वडील म्हणाले.

''बरे, ते कपडे काढ. कढत पाण्याने अंघोळ कर.'' आई म्हणाली.

मी अंघोळीस गेलो. धाकट्या भावाने माझे लहानसे गाठोडे सोडले. लहान मुलांना सवयच असते. त्यांना वाटत असते, की काहीतरी आपल्यासाठी आणलेले असेल; परंतु मी माझ्या भावंडास काय आणणार? कोणता खाऊ आणणार? कोणते खेळणे आणणार? कोणते रंगीत चित्रांचे पुस्तक देणार? मी गरीब होतो; परंतु माझ्या भावास त्या गाठोड्यात काहीतरी सापडले. त्यात कोट सापडला. नवीन कोट. तो कोट नव्हता, ते हृदय होते, ते प्रेम होते! ती आईची फलद्रूप झालेली शिकवण होती.

''अण्णा, हा लहानसा कोट कोणाचा? हा नवीन कोट कोणाला रे?'' धाकटा भाऊ कोट घेऊन मजजवळ येऊन विचारू लागला.

''मग सांगेन. घरात जा घेऊन.'' मी म्हटले.

''आई, हा बघ कोट. हा काही अण्णाच्या अंगाचा नाही. हा मला आणलाय. होय आई?'' धाकटा भाऊ आईला विचारू लागला.

आईने कोरडे धोतर दिले. मी चुलीजवळ शेकत बसलो.

आई म्हणाली, ''श्याम, हा कोणाचा कोट?''

''मोरू जोश्यांकडे का रे द्यावयाचा आहे? कापातल्या मुक्याने पाठविला असेल!'' वडील म्हणाले.

''नाही. हा मी पुरुषोत्तमसाठी शिवून आणला आहे.'' मी म्हटले.


''पैसे रे कोठले? कोणाचे कर्ज काढलेस? का फीचे दवडलेस?'' वडिलांनी विचारले.

''कोणाच्या पैशांना हात तर नाही ना लावलास?'' आईने कातर स्वरात विचारले.

''आई, मी कर्ज काढले नाही, चोरलेही नाहीत, फीचेही खर्चिले नाहीत.'' मी म्हटले.

“मग उधार का शिवून आणलास, श्याम?” वडिलांनी विचारले.

“भाऊ, तुम्ही मला खाऊला आणा, दोन आणे देत असा, ते मी जमविले. गेल्या दोन-तीन महिन्यांचे सारे जमविले. त्यातून हा कोट शिवून आणला. आई म्हणत असे, ‘तुझे अण्णा, दादा मोठे होतील, मग पुरुषोत्तमला नवीन शिवतील कोट.’ मी मनात ठरविले होते, की येताना त्याच्यासाठी नवीन कोट आणावयाचा. पुरुषोत्तम, बघ तुला होतो का?” मी म्हटले.



“अण्णा, हा बघ छान होतो आणि आतलाही खिसा! आता माझी पेन्सिल हरवणार नाही. आई, बघ!” पुरुषोत्तम आईला दाखवू लागला.

मी सांगितलेली हकिकत ऐकून आईला गहिवर आला. ती म्हणाली, “श्याम, तू वयाने मोठा नाहीस, पैशाने मोठा नाहीस, शिकून मोठा नाहीस; परंतु मनाने मोठा आजच झालास हो! हेच प्रेम बाळांनो, पुढेही ठेवा. या प्रेमावर कोणाची दृष्टी नको पडायला.”

वडिलांनीही माझ्या पाठीवरून हात फिरवला. ते बोलले नाहीत. त्या हात फिरविण्यात सारे बोलणे होते. साऱ्या स्मृती होत्या.

**शब्दार्थ :** **स्वाद** – चव. **रोजगारी होणे** – कामधंद्याला लागणे. **गाबड्या** – ठिगळ, कापड फाटल्यावर त्याठिकाणी लावलेले दुसरे कापड. **डोळे अश्रूंनी न्हाणे** – डोळ्यांतून अश्रू ओघळणे. **पऱ्ह्या** – ओढा. **दुथडी भरून वाहणे** – पूर्ण भरून वाहणे. **पंचमहाभूते** – पृथ्वी, जल, अग्नि, वायू, आकाश. **फलद्रुप** – फळाला आलेली. **दवडणे** – वाया घालवणे. **स्मृती** – आठवणी.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) नवीन पाऊस सुरू होण्याचा मातीवर काय परिणाम होतो?

(आ) श्यामने कोणता निश्चय केला होता?

(इ) लहान भावाला आईने कसे समजावले?

(ई) श्यामचे वडील वरचेवर दापोलीला कशासाठी जात?

(उ) श्यामला चालण्याचे श्रम का वाटत नव्हते?

प्र. २. खालील आकृत्या पूर्ण करा.

(अ) श्यामला थंडीच्या दिवसांत न मिळणाऱ्या गोष्टी

(आ) श्यामने आणलेला नवीन कोट बघून त्याच्या आईवडिलांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न

प्र. ३. का ते लिहा.

(अ) श्यामचे डोळे अश्रूंनी न्हाले होते.

(आ) श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांनी त्याला 'जाऊ नको' असे म्हटले.

(इ) पिसईचा पऱ्ह्या दुथडी भरून वाहत होता.

(ई) श्यामने सांगितलेली हकिकत ऐकून आईला गहिवर आला.



**चर्चा करा. सांगा.**

- 'पंख असते तर एकदम उडून गेलो असतो' यामागील श्यामची कल्पना काय असावी, याबाबत मित्रांशी चर्चा करा.

**खेळूया शब्दांशी.**

(अ) खाली दिलेल्या शब्दांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द चौकटीतून शोधून लिहा.

थंड, सापडणे, सुगंध, थोरला, जुना, लक्ष, स्मृती

दुर्गंध, विस्मृती, नवीन, गरम, दुर्लक्ष, धाकटा, हरवणे.

(आ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा. तो शब्द गटात का बसत नाही ते सांगा.

(१) समीरा, विनीता, त्यांनी, निखिल.

(२) मी, सातपुते, त्याने, तिला.

(३) हिमालय, सुंदर, प्रसन्न, भव्य.

(४) लिहिणे, आम्ही, गाणे, वाचणे.

CNVYXE



**लिहिते होऊया.**

- तुम्ही तुमच्या धाकट्या भावासाठी/बहिणीसाठी कोणकोणत्या भेटवस्तू घेता? कोणकोणत्या प्रसंगी घेता?

## आपण समजून घेऊया.

• मागील इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या विकारी शब्दप्रकारांचा अभ्यास केला आहे. या इयत्तेत आपण अविकारी शब्दप्रकारांचा अभ्यास करणार आहोत. क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये या शब्दप्रकारांना अविकारी म्हणतात, कारण लिंग, वचन, विभक्ती इत्यादींचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्या शब्दप्रकारांतील शब्दांच्या रूपांमध्ये काही बदल होत नाही.

• **खालील वाक्ये वाचा.**

रवी अतिशय मनमिळाऊ आहे. त्याच्या घराच्या पलीकडे व्यायामशाळा आहे. व्यायाम करून घरी आल्यावर तो आपली सगळी कामे पटपट आवरतो. रवी नेहमी सर्वांशी नम्रपणे बोलतो.

वरील वाक्यांतील अधोरेखित केलेले अतिशय, पलीकडे, पटपट व नेहमी हे शब्द क्रियाविशेषण अव्यये आहेत. हे शब्द वाक्यातील क्रियापदाबद्दल विशेष माहिती देतात. वाक्यातील क्रियापदाबद्दल विशेष माहिती देणारे शब्द **क्रियाविशेषण अव्यये** असतात. वाक्यांतील क्रिया कधी घडली, कुठे घडली, कशी घडली, किती वेळा घडली यांवरून वाक्यांतील क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार ओळखता येतात.

### क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार



**पूर्वी शिक्षक पगडी घालत असत.**
**– कालवाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., आधी, सध्या, हल्ली, सदा, उद्या, नित्य, वारंवार इत्यादी.



**गोगलगाय हळू चालते.**
**– रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., पटकन, पटपट, जलद, आपोआप इत्यादी.



**सभोवार जंगल होते.**
**– स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., सर्वत्र, इथे, जिथे, जिकडे, खाली, मागे, अलीकडे इत्यादी.



**टोपलीत भरपूर फुले आहेत.**
**– परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., किंचित, काहीसा, अत्यंत, मोजके इत्यादी.

• **खाली दिलेल्या शब्दांचे क्रियाविशेषण अव्ययांच्या प्रकारांनुसार चौकटीत वर्गीकरण करा.**

तिथे, दररोज, टपटप, क्षणोक्षणी, सावकाश, पलीकडे, अतिशय, पूर्ण, परवा, समोरून, जरा, मुळीच, कसे, वर, थोडा, सतत, झटकन.

| कालवाचक क्रियाविशेषण अव्यये | स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये | रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये | परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये |
|---|---|---|---|
| | | | |

**शिक्षकांसाठी :** क्रियाविशेषण अव्यये व त्यांचे प्रकार यांची विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा. क्रियाविशेषण अव्ययांचा वापर करून वाक्ये तयार करण्यास सांगावे.

# ३. माझ्या अंगणात

● **ऐका. वाचा. म्हणा.**

गहू शाळवाचं मोती
काळ्या रानात सांडलं,
आणि माझ्या अंगणात
लख्ख चांदणं पडलं ।।१।।

काळ्याशार मातीतुनी
मोती-पवळ्याची रास,
अंगणात माझ्या डुले
रानमेव्याची मिजास ।।२।।

दिला-घेतला वाढतो
रानातला रानमेवा,
तुम्ही आम्ही सारेजण
गुण्यागोविंदानं खावा ।।३।।

जीव दमतो, शिणतो
घास भरवते माय,
घरामंदी घरट्यात
जशी दुधातली साय ।।४।।

अंगणात आज माझ्या
दाणं टिपती पाखरं,
दूर उडुनिया जाता
आसू येती गालावर ।।५।।




**ज्ञानेश्वर कोळी** (जन्म-१९५६) : 'जगणे माझे', 'आयुष्याच्या वाटेवर', 'घन दाटलेले', 'छावणीच्या कविता', 'आकाश पेलताना' हे कवितासंग्रह; 'आठआण्याचा गुळ' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

शेतकरी शेतात रात्रंदिवस काम करतो. जेव्हा त्यांच्या शेतात खूप धान्य पिकते, तेव्हा त्याला खूप आनंद होतो. प्रस्तुत कवितेतून शेतकऱ्याच्या मनातील विविध भावनांचे वर्णन कवीने केले आहे.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्याव्यात.

**शब्दार्थ : शाळवाचं मोती** – ज्वारीचे दाणे. **रास** – ढीग. **मिजास** – तोरा. **रानमेवा** – रानात पिकणारी फळे. **शिणणे** – दमणे, थकणे. **आसू** – डोळ्यांतील पाणी, अश्रू.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवीच्या अंगणात कशाकशाची रास पडते ?

(आ) रानमेवा कुठे उगवला आहे ?

(इ) कवी गुण्यागोविंदाने रानमेवा खायला का सांगत आहे ?

(ई) कवीच्या अंगणात पाखरे का येतात ?

**प्र. २. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा.**

(अ) गहू, ज्वारीच्या राशीच राशी शेतात पडल्या आहेत.

(आ) काळ्याभोर मातीतून टपोरे, दाणेदार असे खूप सारे धान्य पिकते.

(इ) शेतातून काम करून दमून आल्यावर आई घास भरवते.

(ई) रानातला रानमेवा एकमेकांना देत, घेत आनंदाने खाऊया.

**प्र. ३. तुम्ही पाहिलेल्या एखाद्या धान्याच्या शेताचे वर्णन थोडक्यात लिहा.**



**चर्चा करा. सांगा.**

- **रानमेवा कशाला म्हणतात? रानमेव्यात कोणती फळे येतात, याविषयी कुटुंबातील व्यक्तींशी चर्चा करा.**

**खेळूया शब्दांशी.**

**(अ) कंसात दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) काळ्याशार मातीतुनी मोती–पवळ्याची..............
(मिजास, आस, रास)

(२) घरामंदी घरट्यात जशी दुधातली...............
(माय, साय, जाय)

(३) दूर उडुनिया जाता, आसू येती...............
(गालावर, सारेजण, घरट्यात)

**(आ) समूहदर्शक शब्दांची यादी करा.**

उदा., धान्याची रास

(१) लाकडाची (३) केळीचा (५) मुलांचा

(२) पक्ष्यांचा (४) प्राण्यांचा (६) द्राक्षांचा

**(इ) खालील शब्दांसाठी शेवट समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

(अ) सांडलं (आ) रास (इ) माय

(ई) **खालील शब्दांसाठी प्रमाणभाषेतील शब्द लिहा.**


(अ) खावा (आ) माय (इ) घरामंदी (ई) आसू

**उपक्रम :**

तुमच्या परिसरातील एखाद्या अनुभवी शेतकऱ्याची तुम्हांला मुलाखत घ्यायची आहे, त्यासाठी प्रश्नावली तयार करा.


## खेळ खेळूया.

- **'स' चा शब्दपंखा पूर्ण करा.**




(१) वर्णमालेतील बत्तीसावे अक्षर.
(२) जंगलातील एक भित्रा प्राणी.
(३) नेहमी.
(४) एक शीतपेय.
(५) रस्ता.
(६) उत्सव.
(७) ढीग या शब्दासाठी कवितेत आलेला शब्द. रा...

## कविता करूया.




वरील आकृत्यांमध्ये गोलात दिलेल्या शब्दांशी संबंधित काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांचे निरीक्षण करा. यांमध्ये शेवट समान असणारे काही शब्द आहेत.

उदा., खेळ, मेळ, नारळ
सण, तोरण, सारेजण
दार, घर, सुंदर

अशा शब्दांना यमक जुळणारे शब्द म्हणतात.

या शब्दांचा वापर करून आपल्याला लयबद्ध वाक्ये तयार करता येतात.

उदा., घराभोवती प्रशस्त अंगण,
जमले तेथे सारेजण,
सडा, रांगोळी अन् तोरण,
साजरे करतो सगळे सण.

याप्रमाणे वरील आकृत्यांमध्ये दिलेल्या इतर शब्दांचा उपयोग करून कवितेच्या ओळी तयार करा.

# ४. गोपाळचे शौर्य

**लक्ष्मीकमल गेडाम** (जन्म-१९५६) : लेखिका, कवयित्री, कथाकथनकार. 'शिवाफेरी', 'दुरून डोंगर साजरे', 'पितरांचं पात्र', 'अडोसा' हे कथासंग्रह; 'हृदयपरिवर्तन', 'किशोरांची करामत' हे बालसाहित्य; 'तुरुंगवाडा' ही कादंबरी; 'आठवांचे झेले' हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध.

डोंगरावर अचानक लागलेला वणवा व त्याची आग विझवण्यासाठी गोपाळने केलेले प्रयत्न याचे वर्णन प्रस्तुत पाठात आले आहे. गोपाळ या शालेय विद्यार्थ्याच्या शौर्याची ही कथा आहे.



नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यात असलेले मोहदी हे खेडेगाव. गावातील सर्व लोक गुण्यागोविंदाने राहतात. या गावापासून आठ-दहा किलोमीटर अंतरावर 'कर्णागड' नावाचा एक पौराणिक गड आहे. गुरे चारणारे गुराखी दररोजच तिथे जातात. सहल काढणारे, ट्रेकिंगप्रेमी हेसुद्धा अधेमधे तिथे जाताना दिसतात.

गडाच्या पायथ्याशी मंदाकिनी नदी बारमाही झुळझुळत असते. नदीच्या दोन्ही तीरांवरील शेतमळे बारा महिने हिरवेगार असतात. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात तर हा प्रदेश पाचूचा वाटतो. उन्हाळ्यात गडावर वाळलेला पाला-पाचोळा दिसतो. तरीही रानमेव्याची अनेक प्रकारची झाडे तिथे मोसमी फळभाराने लदबदलेली असतात.

वार्षिक परीक्षा संपल्यानंतर लगेचच उन्हाळ्यात मोहदी येथील माध्यमिक शाळेची सहल कर्णागड येथे गेली होती. विद्यार्थी, शिक्षक या सर्वांनी गडाचा भव्य परिसर पाहिला. गडावरील फेरफटका पूर्ण झाल्यावर प्रत्येकाने आपापले कलागुण सादर केले. विद्यार्थ्यांचा संपूर्ण दिवस छान मजेत गेला. सर्व मुले गड उतरून खाली आली.

'मुलांनो, सूर्यास्ताआधी घरी पोहचलेलं बरं!' असे शिक्षकांनी म्हणताच सर्वजण गाडीत जाऊन बसले.

घाटातून गाडी जात असताना, मुलांना घाटाच्या खालच्या बाजूने आग लागलेली दिसली. ''अरे, तो बघा वणवा! वणवा लागलाय, वणवा!'' गाडीतील एकजण ओरडला.

ड्रायव्हरने लगेच गाडीचा वेग वाढवला. नाहक आपण आगीत सापडू नये, हा त्याचा उद्देश होता. गाडी पायथ्याशी येत असताना उतारामुळे गाडीचा वेग मंदावला. 'गाडी थांबवा! ही आग विझवलीच पाहिजे.'' चौदा वर्षांचा गोपाळ ओरडला. गोपाळच्या या वक्तव्यावर गाडीतील सारेजण हसले.

''अरे वेड्या, ही जंगलाची आग आपण कशी काय विझवू शकू?'' शिक्षक दरडावून म्हणाले; पण ते ऐकायला गोपाळ गाडीत होताच कुठे? त्याने तर लगेच गाडीतून उडीही मारली होती. त्याला परत गाडीत घेण्यासाठी ड्रायव्हरलाही नाइलाजाने गाडी थांबवावी लागली.

गोपाळने धावतच जाऊन वाटेलगतच्या शेतातील नदीवरून सुरू असलेला पाण्याने भरलेला रबरी पाइप सर्व शक्तीनिशी ओढायला सुरुवात केली. साधारणपणे अडीच-तीन इंच परीघ असलेला तो लांबच लांब पाइप गोपाळ आगीच्या दिशेने ओढत आणत होता.



''ह्ये आग एकट्याकडून इझणार नाईच. हे मलेही माईत हाये, पन म्हनून काय परेतनंच करावं न्हाई का काय? सर, असं जंगलंच आम्हां आदिवासींचे पोशिंदे हायेत. आन् मायबापाले कोनी असं आगीच्या मुखी सोडून जातेत काय?'' बाजूला उभा असलेला गावातील एक गुराखी सरांना म्हणाला.

गोपाळ गुराख्याकडे पाहून म्हणाला, ''माणसं असो का जनावरं त्यांना वाचवलंच पाहिजे ना! सर्वांनी मिळून आग विझवलीच पाहिजे.'' हे पाहून सर्व विद्यार्थी व शिक्षक एकापाठोपाठ एक गोपाळच्या मदतीला धावले.

एवढ्यात दुसरी एक गाडी गडावरून खाली उतरली. त्या गाडीतील पन्नाशीचे एक गृहस्थ खाली उतरले. त्यांनी सर्व प्रकार क्षणात न्याहाळला आणि त्यांनी मोबाईल कानाला लावला. मोबाईलवरील संभाषण संपताच ते गोपाळच्या मदतीलाही गेले. आता तो पाइप सहजगत्या चौफेर पाणी फेकू लागला.

पायथ्याची आग हळूहळू शांत होत होती. ''गडावर पुढे पुढे पसरत असलेली आगही आटोक्यात आणली पाहिजे.'' दुसऱ्या गाडीतील गृहस्थ म्हणाले. ''पण साहेब, हे कसं शक्य आहे? मला तर हा वेडेपणाच वाटतो.'' शिक्षक हतबल झाल्यासारखे बोलले. त्या गृहस्थाने फोनवरून अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांना बोलावून घेतले आहे हे सरांना सांगितले.

वीस मिनिटांच्या आतच पंधरा-वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या नरखेडहून अग्निशामकदलाच्या दोन गाड्या गडाच्या पायथ्याशी हजर झाल्या. लगेच त्यांनी पाण्याचा मारा सुरू केला. आग आटोक्यात येऊन संपूर्णत: शांत झाली होती. आता सर्वांचेच चेहरे उजळले होते. सर्वांनाच नवी ऊर्जा मिळाली होती.


अशातच गाईवासरं घेऊन गेलेले काही गुराखी मुलांजवळ आले. त्यांतील एकजण हात जोडून म्हणाला, ''लय बेस झालं बापा. आग इझली. गडावरचीतं कितीकंच झाडं-झुडपं भाजून निघालीत. जरासा का उशीर झाला असता तं आम्हीही तसेच भाजून निघालो असतो. आनं आमच्यातं कोनाले पत्ता भी लागला नस्ता, तुम्ही समदं मदतीसं धावून आलेतं'' हे सांगताना त्याला गहिवरून आले होते.

''खरंच, आमच्या या गोपाळनं निरपेक्ष भावनेनं, जिवाची पर्वा न करता हे धाडस केलं. आज केवळ गडच नव्हे, तर गुरं आणि या सर्व गुराख्यांचेही प्राण वाचले. त्याचं हे काम खरंच कौतुकास्पद आहे.'' असे मोठ्या अभिमानाने शिक्षक सर्वांना सांगत होते.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रातून ही बातमी सर्वच लोकांना कळाली. परिसरातील नागरिक गोपाळच्या या शौर्याचे भरभरून कौतुक करत होते.

**शब्दार्थ :** **गुण्यागोविंदाने** – आनंदाने. **पौराणिक** – पुरातन. **परेतनंच** – प्रयत्न. **पोशिंदे** – पोसणारे. **हतबल होणे** – निराश होणे. **निरपेक्ष** – अपेक्षा न ठेवता. **कौतुकास्पद** – कौतुक करण्यायोग्य.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कर्णागड कुठे वसलेला आहे ?

(आ) 'गाडी थांबवा', असे गोपाळ का ओरडला ?

(इ) गोपाळने आग विझवण्यासाठी काय केले ?

(ई) आग वेळेवर विझली नसती तर कोणते नुकसान झाले असते ?

**प्र. २. कोण, कोणास म्हणाले ते सांगा.**

(अ) ''अरे वेड्या, ही जंगलाची आग आपण कशी काय विझवू शकू ?''

(आ) ''माणसं असो का जनावरं त्यांना वाचवलंच पाहिजे ना!''

(इ) ''पण साहेब, हे कसं शक्य आहे ? मला तर हा वेडेपणाच वाटतो.''

**प्र. ३. गोपाळचा कोणता गुण तुम्हांला आवडला ? का ते लिहा.**



## चर्चा करा. सांगा.

- **नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती म्हणजे काय ?**
- **नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती कोणत्या, त्यांची यादी करा.**
- **जंगलामध्ये वणवा लागू नये यासाठी कोणते उपाय करणे आवश्यक आहे, याबाबत मित्रांशी चर्चा करा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांमधील नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे रिकाम्या चौकटींत भरा.**

(अ) कर्णागड नावाचा एक पौराणिक गड आहे.

(आ) ड्रायव्हरने लगेच गाडीचा वेग वाढवला.

(इ) तो लांब पाइप गोपाळने ओढत आणला.

(ई) सर्वांचेच चेहरे उजळले होते.

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| (अ) | | | | |
| (आ) | | | | |
| (इ) | | | | |
| (ई) | | | | |

**(आ) कंसात दिलेले शब्द योग्य ठिकाणी भरून वाक्ये पूर्ण करा.**

(अकल्पित, कौतुकास्पद, प्रत्यक्षदर्शी, पोशिंदा)

(अ) सचिन तेंडुलकरच्या यशस्वी फलंदाजीचे अनेक.................. साक्षीदार आहेत.

(आ) भूज येथे घडलेली भूकंपाची घटना.................. होती.

(इ) शेतकऱ्याला भारताचा.................. म्हणतात.

(ई) .................. काम करणारा विद्यार्थी सर्वांना नेहमीच आवडतो.

**(इ) 'गैर' हा उपसर्ग लावून तयार झालेले शब्द खाली दिले आहेत. 'बिन', 'परा' हे उपसर्ग लावून तयार होणारे शब्द लिहा.**

| गैर | बिन | परा |
|---|---|---|
| गैरहजर, गैरसोय, गैरसमज | | |

- **खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये अधोरेखित करा.**

(अ) माझे हसणे क्षणोक्षणी वाढतच गेले.

(आ) मंदा लिहिताना नेहमी चुका करते.

(इ) आईने आशाला शंभरदा बजावले.

(ई) सभोवार दाट झाडी होती.

- **कंसात दिलेली क्रियाविशेषण अव्यये वापरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(समोरून, सगळीकडे, पूर्वी, घटाघटा.)

(अ) ............ वाहतुकीची साधने कमी होती.

(आ) मी ............ पाणी प्यायलो.

(इ) मला आई ............ येताना दिसली.

(ई) ............ हिरवेगार गवत उगवले होते.

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) मी घरी गेले; पण घराला कुलूप होते.

(आ) अश्विनी खेळायला गेली; परंतु मैदानावर कोणीच नव्हते.

दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडायची असल्यास ';' हे चिन्ह वापरले जाते. त्यास **अर्धविराम** असे म्हणतात.

## सुविचार

- **आवड आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नाही.**
- **शरीराला श्रमाकडे, बुद्धीला मनाकडे आणि हृदयाला भावनेकडे वळवणे म्हणजे शिक्षण होय.**
- **अनुभवासारखा उत्तम शिक्षक नाही.**



## वाचा.

गवत जाळल्यामुळे पुढील वर्षी पावसाळ्यात गवताची चांगली वाढ होते, या समजुतीतून डोंगरावरील गवताला आग लावली जाते. काही ठिकाणी मोहफूल, तेंदूपत्ता गोळा करताना स्थानिक लोकांकडूनही काही भागांत आग लावली जाते; परंतु त्यावर नियंत्रण न राखता आल्याने ही आग रौद्ररूप धारण करते. त्यामध्ये डोंगरावरील गवत जळून नष्ट होते, त्याबरोबरच अनेक लहानमोठी झाडेही जळतात. झाडांच्या आसऱ्याला राहणारे अनेक पक्षी व प्राणी हेही आगीचे भक्ष्य बनतात. वनसंपदेबरोबरच वणव्याचा मोठा परिणाम प्राण्यांच्या अन्नसाखळीवर होत आहे. हिरव्या पाल्याच्या शोधात तृणभक्षी प्राणी जंगलाकडे वळतात; परंतु अशा वणव्यांमुळे त्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो.

बऱ्याच वेळा डोंगरभागात फिरायला म्हणून जाणारे काही पर्यटक धूम्रपान करतात. विडी पेटवण्यासाठीची आगपेटीची जळती काडी जंगलात फेकतात. या जळत्या काडीमुळे वाळलेले गवत पेट घेते आणि पुढे त्याचे वणव्यात रूपांतर होते. या वणव्यामुळे जंगलांमध्ये पुनर्निर्मिती व चाऱ्याची उपलब्धता यांवर विपरीत परिणाम होत आहे.

**प्राणी व वृक्ष वाचवण्यासाठी, वणवा लागू नये यासाठी सर्वांनी काळजी घेणे गरजेचे आहे.**

### अग्निशमन सेवा

कोठेही आग लागली, तर एक लाल रंगाची गाडी जोरजोरात घंटा वाजवत आगीच्या ठिकाणी येते. त्यातील कर्मचारी पाण्याच्या मोठमोठ्या नळकांड्या घेऊन आग आटोक्यात आणतात. आग विझवतात. या दलातील कर्मचाऱ्यांच्या हालचाली खूप वेगवान व शिस्तबद्ध असतात. आग विझवण्याचे हे प्रात्यक्षिक बघण्यासारखे असते.






आग लागणे, घर पडणे, झाड पडणे, मोठा अपघात होणे अशा आपत्कालीन परिस्थितीतून आपल्याला बाहेर काढण्याचे काम अग्निशमन दल करते. या दलास पाचारण करण्यासाठी १०१ या करमुक्त दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधतात व आपत्कालीन घटना घडलेल्या ठिकाणचा पत्ता व थोडक्यात तपशील देतात. अग्निशमन दल घटनास्थळी तत्काळ पोहोचते. आपल्याला मदत करण्यासाठी आलेल्या या कर्मचाऱ्यांना आपण सहकार्य केले पाहिजे. ते देत असलेल्या सूचनांनुसार वागले पाहिजे. त्यांच्या कामात व्यत्यय येणार नाही, असे आवर्जून पाहिले पाहिजे, कारण 'अग्निशमन दल' हा आपला मित्र आहे.

# ५. दादास पत्र





दिनांक : २५.०१.२०२१

**प्रिय दादा,**

सप्रेम नमस्कार.

दादा, कालच मी सहलीला जाऊन आले. अरे, इतकी मजा आली, काय सांगू! या महिन्यात विज्ञान केंद्रातर्फे आमच्या शाळेत पक्ष्यांसंबंधीची चित्रफीत दाखवली. ती पाहून आणि तेव्हा ताई-दादांनी सांगितलेली माहिती ऐकून यावर्षी शाळेची सहल एखाद्या अभयारण्यातच न्यायची, असा हट्ट आम्ही शिक्षकांजवळ धरला.

सहलीच्या दिवशी आम्ही पहाटेच निघालो. सोलापूर-बार्शी मार्गावर बावीस किलोमीटर अंतरावर असलेल्या नान्नज गावाजवळ 'माळढोक अभयारण्य' आहे. ठरलेल्या वेळी आम्ही तिथे पोहोचलो. अभयारण्यातून फिरत असताना सर सांगत होते, की 'भारतातून नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या माळढोक या अत्यंत देखण्या पक्ष्याला वाचवण्यासाठी वनविभागानं हे अभयारण्य घोषित केलेलं आहे. माळढोक पक्षी शेतकऱ्याचा मित्र आहे, कारण शेतातील किड्यांवर तो गुजराण करतो. हा पक्षी वर्षातून एकदाच अंडी घालत असल्याने त्यांची संख्या कमी आहे. शिवाय इतर प्राण्यांनी माळढोक पक्ष्यांची अंडी तुडवली, तर संख्या आणखीनच कमी होते.




दादा, आम्ही हा माळढोक पक्षी अगदी जवळून व निरखून बघितला. काय त्याचा रंग! काय त्याची चोच! इतका देखणा पक्षी मी यापूर्वी कधीही बघितला नव्हता. माळढोक पक्ष्यांबरोबरच आम्ही चंडोल, माळटिटवी तसेच इतर पक्षीही पाहिले. आमच्या शिक्षकांनी माळढोक पक्ष्यांचे फोटो कॅमेऱ्यात टिपले. पक्ष्यांचे फोटो काढण्यापूर्वी वनखात्याची पूर्वपरवानगी घ्यावी लागते, हे आम्हांला नव्यानंच समजलं.

पक्षी हा संतुलित पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहे. प्रदूषण टाळण्यात, बियांचं वहन करण्यात त्यांची प्रमुख भूमिका असते, हे आमच्या सरांनी सांगितलेलं आम्हांला पटलं. आमची सहल अविस्मरणीय झाली. दादा, अभयारण्यातून फिरताना मला तुझी खूप आठवण आली, कारण तुलाही पक्षी खूप आवडतात.

इकडे मी, आई, बाबा मजेत आहोत. तू कसा आहेस? तुझा अभ्यास कसा सुरू आहे? पत्र मिळताच तुझी खुशाली कळव. आम्ही तुझ्या पत्राची वाट बघत आहोत.

तुझी बहीण,
आयेशा



## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) विद्यार्थ्यांनी अभयारण्यात सहलीला जाण्याचा हट्ट का धरला?

(आ) अभयारण्यातून फिरताना सरांनी विद्यार्थ्यांना माळढोक पक्ष्याबद्दल काय सांगितले?



### चर्चा करा. सांगा.

- पक्षी हा संतुलित पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहे, याविषयी पालकांसोबत चर्चा करा.
- पक्ष्यांची संख्या वाढवण्यासाठी तुम्ही काय करू शकता, याविषयी मित्रांसोबत चर्चा करून यादी तयार करा.

### माहिती मिळवूया.



माहिती घेण्यासाठी किंवा देण्यासाठी अनेक साधने वापरली जातात. खाली माहिती देवाणघेवाण करण्याची/संवादाची काही साधने दिली आहेत. त्यांतील काही साधने एकतर्फी व काही साधने दुतर्फी माहितीची/संवादाची देवाणघेवाण करतात. त्यांची माहिती मिळवा व दिलेल्या तक्त्यात वर्गीकरण करा.

फॅक्स, पत्र, ई-मेल, मोबाईल, आंतरजाल, रेडिओ, वर्तमानपत्र, मोबाईल संदेश, चर्चा, मुलाखत, जाहिरात, भाषण, संभाषण.

| एकतर्फी माहितीची/संवादाची साधने | दुतर्फी माहितीची/संवादाची साधने |
|---|---|
| | |

**उपक्रम :**

तुम्ही भेट दिलेल्या एखाद्या पर्यटनस्थळाचे वर्णन करणारे पत्र मित्राला/मैत्रिणीला लिहा.

### शब्दकोडे सोडवूया.

- **खालील चौकोनांतील अक्षरांमध्ये क्रियाविशेषण अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या व तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन क्रियाविशेषण अव्यये बनवा व दिलेल्या जागेत लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ह | ळू | थो | डे | आ | रो |
| आ | ज | डा | मो | ज | के |
| ज | रा | सा | व | का | श |
| त | सा | जि | र | ल | ही |
| अ | ने | क | दा | चि | त |
| ति | क | डे | खा | ली | र |

________ ________
________ ________
________ ________
________ ________
________ ________
________ ________

## ● आम्ही सूचनाफलक वाचतो.




- **वरील सूचनाफलकाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) ही सूचना कोणत्या तारखेला देण्यात आली आहे ?

(२) पाणीपुरवठा कधी बंद करण्यात येणार आहे ?

(३) पाणीपुरवठा बंद का ठेवण्यात येणार आहे ?

(४) पाण्याच्या वापराबाबत नागरिकांना कोणती सूचना देण्यात आली आहे ?

- **खालील परिच्छेद वाचा.**

सायंकाळ झाली, की आजी घराच्या व्हरांड्यात खुर्ची टाकून बसते. सोबत आणखी दोन-तीन खुर्च्याही ठेवते. समोरच्या रस्त्या-वरची ये-जा न्याहाळते. रस्त्यावरून तिच्या ओळखीची व्यक्ती जाऊ लागली, की त्या व्यक्तीस हाक मारते. तिची ख्यालीखुशाली विचारल्याशिवाय आजीला चैन पडत नाही.

(– हे चिन्ह दोन कारणांनी वापरतात.)

(१) दोन शब्द जोडताना.
उदा., ये-जा, दोन-तीन.

(२) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास.
उदा., रस्त्या-वरची.

‘–’ या चिन्हास **संयोगचिन्ह** म्हणतात.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना परिसरतील विविध सूचनाफलकांचे वाचन करण्यास सांगावे.

# ६. टप् टप् पडती

● **ऐका. वाचा. म्हणा.**



टप् टप् पडती अंगावरती प्राजक्ताची फुले
भिर् भिर् भिर् भिर् त्या तालावर गाणे अमुचे जुळे!

कुरणावरती, झाडांखाली ऊनसावली विणते जाळी
येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने डुले!

दूरदूर हे सूर वाहती, उन्हात पिवळ्या पाहा नाहती
हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले!

गाणे अमुचे झुळझुळ वारा, गाणे अमुचे लुकलुक तारा
पाऊस, वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले!

फुलांसारखे सर्व फुला रे, सुरात मिसळुनि सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे, बाकी सारे खुळे!

**मंगेश पाडगांवकर** (१९२९–२०१५) : 'धारानृत्य', 'जिप्सी', 'छोरी', 'मीरा', 'सलाम' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

मोकळ्या कुरणावरती असणाऱ्या प्राजक्ताच्या झाडाची पडणारी फुले व त्यांचे सौंदर्य अनुभवणाऱ्या मुलांच्या मनातील आनंद प्रस्तुत कवितेतून कवीने व्यक्त केला आहे.

**शब्दार्थ : कुरण** – गवत, चराऊ जमीन. **भरारा** – भरभर. **झोपाळा** – झोका. **खुळे** – वेडे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील मुलांचे गाणे कधी जुळून येते?

(आ) गवत खुशीने का डुलते?

(इ) मुलांच्या गाण्यातून काय काय फुलते?

(इ) कवितेत खुळे कोणाला म्हटले आहे?

**प्र. २. कवितेच्या खालील ओळी पूर्ण करा.**

(अ) कुरणावरती, .....................

(आ) हसते धरती, .....................

(इ) पाऊस, वारा, .....................

## खेळूया शब्दांशी.

**(अ) 'टप् टप्' या शब्दाप्रमाणे कवितेत आलेले इतर नादानुकारी शब्द लिहा.**

**(आ) खाली दिलेल्या 'अ' गट व 'ब' गट यांमधील शब्दांचा योग्य सहसंबंध लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| हसरी | वारा |
| झुळझुळ | तारा |
| फांदी | धरती |
| लुकलुक | झोपाळा |

**(इ) खालील शब्दांत लपलेले शब्द लिहा.**

उदा., मोरपिसारा — मोर, पिसारा, पिसा, सार, सारा.

(१) कुरणावरती (२) झाडाखाली (३) ऊनसावली

**(ई) खाली दिलेल्या पिवळ्या चौकोनातील शब्दांना हिरव्या चौकोनात दिलेले विरुद्ध अर्थाचे शब्द शोधा व लिहा.**

उदा., बरे × वाईट

पिवळा चौकोन: बरे, चढ, नफा, आत, आनंद, यश, मोठे, शुभ

हिरवा चौकोन: अशुभ, अपयश, उतार, लहान, बाहेर, वाईट, तोटा, दु:ख

## खेळ खेळूया.

- खालील वाक्यडोंगर वाचा. त्याप्रमाणे दिलेल्या शब्दाचा वाक्यडोंगर बनवा.

आंबा
आंबा खातो.
मी आंबा खातो.
मी पिवळाधमक आंबा खातो.
मी पिवळाधमक, गोड आंबा खातो.
मी पिवळाधमक, गोड हापूस आंबा खातो.
मी पिवळाधमक, गोड हापूस आंबा चवीने खातो.

शाळा

## माहिती मिळवूया.



❖ **फुलांना रंग कशामुळे प्राप्त होतो?**

फुलांमध्ये दोन प्रकारची रंगद्रव्ये असतात. हरितद्रव्ये, कॅरोटिन यांमुळे नारिंगी, पिवळा, हिरवा हे रंग फुलांच्या पाकळ्यांना मिळतात. लाल, गुलाबी, निळा वगैरे रंग फुलांमधील अँथोसायनीन या रंगद्रव्यामुळे मिळतात. ही रंगद्रव्ये पाण्यात विरघळू शकतात. ज्या वेळी फुलांना जीवनरसाचा पुरवठा होतो, त्या वेळी त्यात ही रंगद्रव्ये विरघळतात.

कोणत्या फुलांत कोणती रंगद्रव्ये असावीत, हे त्यांतील गुणसूत्रे ठरवतात आणि गुणसूत्रे आनुवंशिक असल्यामुळे त्या त्या फुलांचा रंग ठरावीकच असतो, तो बदलत नाही.



## वाचा.

रंगीबेरंगी फुलांचे ताटवे पाहिले, की मन कसे प्रसन्न होऊन जाते. आपल्या सभोवती उमललेल्या फुलांच्या सुवासाने आजूबाजूचे वातावरण सुगंधित होते. त्या नाजूक, टवटवीत, गंधमिश्रित फुलांच्या दर्शनाने नयनसुख मिळते. आज उमललेले फूल उद्या कोमेजून जाणार असते; पण त्याच्या या क्षणभंगुर जीवनासाठी फुलाला कधी रडताना पाहिले आहे का तुम्ही? दुसऱ्याला प्रफुल्लित करत, सुवास देत ते हसत-बागडत राहते. ते आपल्याला असे तर सांगत नसेल ना, की 'मुलांनो, आजचा दिवस आपला आहे. या दिवशी आनंदाने हसा, खेळा, बागडा. दुसऱ्यांना आनंद, सुख-समाधान देण्यातच खरा आनंद दडला आहे.'

**शिक्षकांसाठी :** वरील उताऱ्याचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे. निसर्गात घडणाऱ्या विविध बदलांचे निरीक्षण करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांनी अनुभवलेले प्रसंग वर्गात सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ७. आजारी पडण्याचा प्रयोग

**द. मा. मिरासदार** (जन्म-१९२७) : प्रसिद्ध लेखक, कथाकथनकार. 'गप्पागोष्टी', 'गप्पांगण', 'गाणारा मुलूख', 'गुदगुल्या', 'जावईबापूंच्या गोष्टी', 'ताजवा', 'भुताचा जन्म', 'माझ्या बापाची पेंड', 'मिरासदारी' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध. 'नावेतील तीन प्रवासी' हा अनुवाद, तसेच 'अंगतपंगत', 'बेंडबाजा' हे विनोदी निबंधही प्रसिद्ध.

मुलाचे आजारपणाबाबतचे विचार व त्याचे दवाखान्यातील वागणे याचे मार्मिक व विनोदी वर्णन लेखकाने प्रस्तुत पाठात केले आहे.

आपण एकदाही कधी दुखणेकरी नव्हतो, ही गोष्ट ध्यानात आल्यावर मोठी लाज वाटली. छे, छे ! निदान एखाद-दुसऱ्या वेळी तरी आपण आजारी पडायचे होते ! टायफॉइड, क्षय, न्यूमोनिया असली मोठमोठी, गोड दुखणी राहू द्या बाजूला; पण थंडीताप, खोकला, पडसे यांपैकी काहीतरी माझ्या वाटणीला यायला हवे होते. निदान पोटदुखी, डोकेदुखी यांतले तरी काही. आपल्या स्वतःच्या मालकीची एकही औषधाची बाटली अजून असू नये ! एखादेही साधे इंजेक्शन माझ्या वाटणीला येऊ नये काय ?

आमच्या घरात नेहमी कुणीतरी आजारी पडायचे. आई नेहमी खोकायची. बाबांना दर आठ दिवसांनी पडसे यायचेच. दादा कॉलेजात जात असला तरी त्याचे अंग नेहमी दुखायचे. कधीकधी ताईचे हात दुखायचे, पाय दुखायचे. तीही गादी टाकून झोपायची. सगळ्यांची औषधे मोठी छान असायची. संत्री, मोसंबी, सफरचंद, खडीसाखर, बेदाणा, पेढे, गोड औषध यांचा मारा सारखा चाललेला असायचा. चार दिवस आजारी पडून अशक्तपणा आला, म्हणजे शिराही रोज व्हायचा. हा सगळा प्रकार पाहून आपण आजारी नाही, या गोष्टीचे मला अत्यंत दुःख होऊ लागले. जे पदार्थ ही सगळी मंडळी आजारी म्हणून खात असत, ते 'औषध' या नावाखाली मोडत असत. त्यामुळे त्यांना हात लावायची मला सक्त मनाई असे. ही औषधे आपणही बरोबरीने घ्यावीत आणि त्यांच्या दुःखात सहभागी व्हावे असे मला फार वाटू लागले.

या विचाराने मला काही सुचेना. घरातल्या माणसांचा मला मोठा राग येऊ लागला. त्यांचा स्वार्थीपणा पाहून मी अगदी चिडून गेलो. ती मंडळी स्वतःच इतक्या वेळा आजारी पडत होती, की माझ्या वाटणीला कोणतेच आजारपण येत नव्हते. ते काही नाही. आपण आजारी पडून डॉक्टरांकडून औषध आणायचेच, असे शेवटी मी ठरवून टाकले.

मग नेहमीप्रमाणे मी रोजच्या तीन-चार बाटल्या घेतल्या आणि डॉक्टरांकडे गेलो. चड्डीच्या खिशात मी स्वतःची बाटली निराळी जपून ठेवली होती.

दवाखान्यात खूप गर्दी होती. खूप माणसे असली म्हणजे मला फार बरे वाटे, कारण त्यामुळे बराच वेळ दवाखान्यात बसता येते. शिवाय बसलेल्या माणसांच्या चेहऱ्यांकडे बघता येते. काय छान दिसतात एकेक लोक !

हळूच मी खुर्चीवर बसलो आणि लोकांकडे टकामका बघू लागलो. काही लोक कण्हत होते. कुणी इंजेक्शन घेऊन बसले होते. आपल्या दंडावरल्या पिवळ्या डागाकडे मोठ्या फुशारकीने पाहत होते. त्यांच्याकडे पाहून मला त्यांचा फार हेवा वाटू लागला.

हळूहळू पुष्कळ लोक निघून गेले. मग मी हळूच माझी छोटी बाटली डॉक्टरांच्या टेबलावर सरकवली

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी. या कथेचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या विविध कथांचा संग्रह करून त्यांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे.

आणि म्हणालो, ''डॉक्टर मला बरं वाटत नाही हो, मलाही औषध हवं आहे.''

''असं? मग ये इकडे. बघू, तपासू.'' असे म्हणत डॉक्टरांनी मला खाटेवर झोपायला सांगितले. त्या गुलगुलीत खाटेवर झोपताना अशी काही मजा वाटली म्हणता! इतक्या वेळा आपण दवाखान्यात आलो; पण या खाटेवर पडायचे सुख कधीसुद्‌धा आपल्या वाट्याला आले नव्हते. आता डॉक्टर ती छान नळी आपल्या छातीवर, पोटावर लावतील, तपासतील. कदाचित इंजेक्शनसुद्‌धा देतील. नाही कुणी म्हणावे! मग कसले तरी औषध बाटलीत भरून देतील. अहाहा!... आपल्यालाही स्वतंत्र बाटली मिळायची तर एकूण! दादाची आणि ताईचीच ऐट नको काही एवढी...!



आनंदाने मी खाटेवर लोळत होतो. एवढ्यात डॉक्टर खोलीत आले. त्यांनी मला तपासले. इकडे, तिकडे, पालथे वळायला सांगितले. गळ्यातली नळी छातीवर लावली, जीभ बघितली, तेव्हा तर मला अगदी धन्य धन्य वाटू लागले. त्यांनी जेव्हा पोटावर एकदम टिचकी मारली, तेव्हा तर मला खूप हसायलाच आले. मग मी डॉक्टरांना सांगितले, ''डॉक्टर इंजेक्शन द्या बरं का. ताईला आणि दादाला खूप झालीत आतापर्यंत. आता मला पाहिजे. निदान एक तरी.''

डॉक्टर म्हणाले, ''हो का?''

मग क्षणात मनात एक धाडसी विचार चमकून गेला. अगदी खासगी आवाजात मी डॉक्टरांना विचारले, ''तुम्हांला ऑपरेशन करता येतं का हो डॉक्टर ?''

डॉक्टर माझ्याकडे एकदम बघायला लागले. थोडे थांबून म्हणाले, ''का रे बाबा ?''

''नाही. करायचं असलं तर ते सुद्‌धा करा. मी काही घाबरत नाही.'' डॉक्टर पाहतच राहिले. मला वाटले, ते बहुतेक माझ्या सूचनेवर विचार करत असावेत. 'होय' म्हणाले तर फारच चांगले झाले. ऑपरेशन केलेच त्यांनी तर मग काय विचारता! तसाच पळतपळत घरी जाईन. सगळ्यांना ऑपरेशन दाखवीन.


पण डॉक्टर थंडपणे म्हणाले, ''बराय. आता असं कर, तू उतर खाली.'' मी मोठ्या नाखुशीनेच खाली उतरलो. त्यांच्या चेहऱ्याकडे उत्सुकतेने बघू लागलो.

''हे बघ, तुला काही झालं नाही. समजलं ना? ठणठणीत आहे तब्येत तुझी, तेव्हा औषध काही नाही. पळ. जा घरी.''

डॉक्टरांचे हे बोलणे ऐकून माझी फार निराशा झाली. मी रडकुंडीला येऊन म्हणालो, ''असं काय हो? द्या ना मला एखादं औषध.''

---

**शब्दार्थ : पडसे** – सर्दी. **हेवा वाटणे** – असूया वाटणे. **ऐट** –तोरा. **मनात विचार चमकणे** –मनात विचार येणे. **नाखुशी** – नाराजी.



### प्र. १. केव्हा ते लिहा.

(अ) पाठातील मुलाला घरच्यांच्या दु:खात सहभागी व्हावे, असे वाटू लागले.

(आ) मुलाने डॉक्टरांकडून औषध आणायचेच, असे ठरवले.

(इ) मुलाला धन्य धन्य झाल्यासारखे वाटले.

(ई) डॉक्टरांचे बोलणे ऐकून मुलाची निराशा झाली.

### प्र. २. आकृत्या पूर्ण करा.

(अ) मुलाच्या मते

मोठी दुखणी    छोटी दुखणी

(आ) मुलाच्या घरातील आजारी व्यक्तींची औषधे

### प्र. ३. खालील तक्ता पूर्ण करा.

| आपण आजारी असताना काय करू शकत नाही? | आपण आजारी नसताना काय करू शकतो? |
|---|---|
| | |
| | |
| | |

### प्र. ४. तुमच्या घरातील एखादी व्यक्ती आजारी पडल्यास तिला मदत म्हणून तुम्ही काय कराल, ते लिहा.



**चर्चा करा. सांगा.**

- **पाठामध्ये दुखणेकरी हा शब्द आलेला आहे. दुखणेकरी म्हणजे सतत आजारी पडणारी व्यक्ती. खाली काही वाक्प्रचार व म्हणी दिलेले आहेत. शिक्षक व पालक यांच्याशी चर्चा करून त्यांचा अर्थ समजून घ्या. त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) इतिश्री  
(२) छत्तीसचा आकडा  
(३) जमदग्नीचा अवतार  
(४) चोरावर मोर  
(५) लंकेची पार्वती  
(६) कळीचा नारद  
(७) घागरगडचा सुभेदार  
(८) उंटावरचा शहाणा  
(९) गळ्यातला ताईत

**खेळूया शब्दांशी.**

### (अ) खालील शब्दांना मराठी भाषेतील पर्यायी शब्द लिहा.

(अ) डॉक्टर–  (आ) ऑपरेशन–  (इ) मेडिसीन–  (ई) पेशंट–

(आ) 'गुलगुलीत बिछाना' याप्रमाणे खाली दिलेल्या चौकोनांतील शब्दांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| टवटवीत | बटबटीत |
| चमचमीत | मिळमिळीत |
| ठणठणीत | गुळगुळीत |


| | |
|---|---|
| जेवण | भाजी |
| डोळे | आरोग्य |
| दगड | फूल |

__________ __________

__________ __________

__________ __________

(इ) खाली दिलेल्या चौकोनातील चित्रासंबंधी काही शब्द दिलेले आहेत, त्या शब्दांचा उपयोग करून वाक्ये तयार करा.




(ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा उपयोग करून खालील वाक्ये पूर्ण करा.

(सुचेनासे होणे, सक्त मनाई असणे, फुशारकी मारणे, ठणठणीत असणे)

(अ) सुलेमानचाचा रोज सकाळी फिरायला जातात, त्यामुळे त्यांची तब्येत..........

(आ) ध्वनिक्षेपकाच्या आवाजामुळे घरात आजोबांना काही ..........

(इ) जॉन आज शाळेत नवीन कंपास घेऊन आला होता. वर्गातील सर्व मुलांना दाखवत तो खूप .......... होता.

(ई) तो रस्ता खासगी असल्यामुळे आपले वाहन तेथून नेण्याला..........

**उपक्रम :**

मराठी भाषेत विनोदी लेखन करणाऱ्या लेखकांची व त्यांच्या साहित्याची शिक्षक, पालक यांच्या मदतीने यादी करा. विनोदी गोष्टी वाचा व वर्गात सांगा.



**सारे हसूया.**

**संजू** : मोहन, हे बोटावर आकडे का लिहिलेस?

**मोहन** : अरे माझी आजी म्हणते, "नुसत्या बोटावर आकडेमोड करता आली पाहिजे."

**अजय** : थंडी वाजते तेव्हा तू काय करतोस?

**विजय** : मी मेणबत्तीजवळ बसतो.

**अजय** : आणि खूप थंडी वाजली तर?

**विजय** : मेणबत्ती पेटवतो.

## संदेश तयार करूया.

- **दवाखाना वा दवाखान्याच्या परिसरात अनेक पाट्या असतात. त्या वाचा. त्यांवरील मजकूर खालील रिकाम्या पाट्यांवर लिहा.**

## आपण समजून घेऊया.



टेबलावर फुलदाणी आहे.



पिले घरट्याबाहेर उडाली.



कमला विनयापेक्षा उंच आहे.

वरील अधोरेखित शब्द स्वतंत्र नाहीत. वर, बाहेर, पेक्षा हे शब्द अनुक्रमे टेबल, घरटे, विनया या शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. आता, पूर्वी, नंतर, पर्यंत, आत, मागे, शिवाय हीदेखील शब्दयोगी अव्यये आहेत.

जेव्हा शब्दयोगी अव्यये नाम किंवा सर्वनाम यांना जोडून येतात, तेव्हा नामाच्या किंवा सर्वनामाच्या मूळ रूपात बदल होतो. अशा शब्दांना सामान्यरूप म्हणतात. उदा., शाळा–शाळेत, फाटक–फाटकात, रस्ता–रस्त्याला, मुले–मुलांना.

**लक्षात ठेवा :** शब्दयोगी अव्यय व क्रियाविशेषण अव्यय यांत फरक आहे.

- **खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये अधोरेखित करा.**

(अ) आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे.

(आ) मुलांनी फुगेवाल्याभोवती गर्दी केली.


(इ) आमचा कुत्रा मला नेहमी मित्राप्रमाणे भासतो.

(ई) देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे का?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना शब्दयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा. तसेच विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या विषयांवर आधारित घोषवाक्ये, सूचना सुवाच्य अक्षरांत लिहून घ्याव्यात. वर्गात किंवा शाळेच्या परिसरात लावाव्यात.

# ● आपली समस्या आपले उपाय–१

● चित्र पाहा. संवाद वाचा.



**नीता** : आजी हे बघ, नदीतलं पाणी दिसतच नाही.

**आजी** : हो, नदीत जलपर्णी उगवली आहे.

**नीता** : जलपर्णी म्हणजे काय गं आजी ?

**आजी** : पाण्यात उगवणारी वनस्पती.

**नीता** : ती पाण्यात का उगवते ?

**आजी** : पाणी अशुद्ध, प्रदूषित झालं की उगवते.

**नीता** : आजी, आपल्यामुळेच नदीचं पाणी प्रदूषित झालयं ना !

**आजी** : हो, माणसांच्या वाईट सवयींमुळे नदीची हानी होत आहे. शहराच्या सांडपाण्यातून, रासायनिक खतांचा वापर केलेल्या शेत जमिनीतून झिरपणाऱ्या पाण्यातील किंवा कारखान्याच्या सांडपाण्यातील नायट्रोजन व फॉस्फरस ही द्रव्ये पाण्यात मिसळली की जलपर्णी वाढते. जलपर्णीची वाढ ही खऱ्या अर्थाने जलप्रदूषणाची निदर्शक आहे.

**नीता** : अरेरे! आजी, आता या जलपर्णीचं काय करायचं ?

**आजी** : पाणी दूषित होणार नाही याची काळजी घ्यायची.



**विचार करा. सांगा.**

- नदीचे पाणी कशामुळे प्रदूषित होते ?
- नदीचे पाणी प्रदूषित होऊ नये, म्हणून काय उपाय करता येतील ?
- जलपर्णी उगवल्याने पाण्यावर कोणता परिणाम होतो ?
- नदीमध्ये जलपर्णी होऊ नये, यासाठी काय करायला हवे, असे तुम्हांला वाटते ?

## ● आम्ही जाहिरात वाचतो.

**खुशखबर ! खुशखबर ! खुशखबर !**

***शब्दगंगा येऊ द्या घरोघरी!***

**पुस्तकांचे भव्य प्रदर्शन**

**कालावधी :** १५ ते २० ऑक्टोबर २०२१
**वेळ :** सकाळी १०.०० ते सायं. ८.००
**स्थळ :** शारदा विद्यालयाचे सभागृह

**प्रदर्शनाची वैशिष्ट्ये**

- छोट्यांसाठी व मोठ्यांसाठी स्वतंत्र दालन.
- नामवंत साहित्यिकांची पुस्तके.
- विविध विषयांवरील पुस्तके.
- मुलांसाठी आवडत्या गोष्टींची, प्रयोगांची, कोड्यांची आणि कृतींची पुस्तके.
- सायंकाळी ७ ते ८ या वेळेत नामवंत साहित्यिक आपल्या भेटीला व प्रत्यक्ष वार्तालाप करण्याची संधी.



**पुस्तक खरेदीवर २०% सवलत.**

**त्वरा करा. आपला पुस्तकसंग्रह समृद्ध करा.**

**उद्घाटन समारंभ :** १५ ऑक्टोबर सकाळी ठीक १० वाजता.
**उद्घाटक :** शारदा विद्यालयाचे संस्थापक श्री. विजेंद्र सातपुते.

- **वरील जाहिरातीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) ही जाहिरात कशासंदर्भात आहे?
(२) कोणत्या कालावधीमध्ये पुस्तक प्रदर्शन भरवण्यात येणार आहे?
(३) पुस्तक प्रदर्शनाची ठळक वैशिष्ट्ये सांगा.
(४) प्रदर्शन कोठे भरणार आहे?
(५) शंभर रुपयांच्या खरेदीवर किती रुपयांची सवलत मिळणार आहे?
(६) पुस्तक प्रदर्शनात तुम्ही कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदी कराल, ते लिहा.

**ओळखा पाहू!**

(१) हात आहेत; पण हालवत नाही. ☐
(२) पाय आहेत; पण चालत नाही. ☐
(३) दात आहेत; पण चावत नाही. ☐
(४) नाक आहे; पण श्वास घेत नाही. ☐
(५) केस आहेत; पण कधी विंचरत नाही. ☐

D22VIH

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या विविध जाहिरातींचे श्रवण/वाचन करण्यास प्रवृत्त करावे.

# ८. शब्दांचे घर

● ऐका. वाचा. म्हणा.

सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर
त्यांतून काही हळवे हळवे राहत होते स्वर

घरात होता, काना-मात्रा-वेलांटीचा मेळ
एकोप्याने खेळायाचे सगळे अक्षर-खेळ
विरामचिन्हांचीही होती सोबत वरचेवर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

एखाद्याची धुसफुससुद्‌धा हवीहवीशी छान
प्रत्येकाला अर्थ वेगळा सुखदु:खाचे भान
मधले अंतर कुरवाळाया रेघांचे छप्पर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

कानोकानी कुजबुजताना अंकुर मनकोवळा
वाट मोकळी होऊन लागे कवितेचाही लळा
अवतीभवती झिरपत राही गाणे काळीजभर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर






**कल्याण इनामदार** (१९३९-२००८) : 'आभाळाचे पंख', 'अजब गाणी', 'अक्षर गाणी', 'धमाल गाणी' इत्यादी बालसाहित्य प्रसिद्‌ध. भाषेद्‌वारे आपण आपले विचार, सुखदु:ख व्यक्त करतो. प्रस्तुत कवितेतून कवीने आपल्याभोवतीचे शब्दांचे वावरणे कसे सुंदर आहे, हे सांगितले आहे.

**शब्दार्थ : हळवे** – कोमल. **मेळ** – एकत्र असणे. **धुसफुस** – जळफळणे. **भान** – लक्ष, ध्यान. **झिरपणे** – पाझरणे.

## स्वाध्याय



**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) शब्दांच्या घरात राहणारे –

(आ) घरात एकोप्याने खेळणारे –

(इ) अवतीभवती झिरपणारे –

**प्र. २. कवितेच्या खालील ओळी पूर्ण करा.**

(१) घरात होता,..............
.............. अक्षर-खेळ.

(२) एखाद्याची..............
.............. भान.

(३) कानोकानी..............
.............. कवितेचाही लळा.



### चर्चा करा. सांगा.

- **शब्दांमुळे, भाषेमुळे दैनंदिन व्यवहारात कोणते फायदे होतात, या विषयावर मित्रांशी चर्चा करा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांपासून अर्थपूर्ण शब्द बनवा.**

उदा., लांटीवे-वेलांटी

(१) सफुधुस (२) रकुअं (३) कानीनोका

**(आ) खालील शब्दांना कवितेत आलेली विशेषणे लिहा.**

(१) ..............घर.

(२) ..............स्वर.

(३) ..............अंकुर.

(४) ..............वाट.

**(इ) खालील शब्दसाखळी पूर्ण करा.**

उदा., सुनीता → तारा → राघवेंद्र → द्रव → वजन → नमन →.........

**प्रकल्प :**

'शब्द' या विषयावर आधारित सुविचार मिळवा. त्यांचा संग्रह करा. त्याची सुंदर चिकटवही बनवा.

## खेळ खेळूया.

- **खालील चौकटी वाचा. त्याप्रमाणे उरलेल्या चौकटी पूर्ण करा.**

(अ) कप → काटा → किसणी → कीव → कुसुम → कूट → केर → कैरी → कोपरा → कौल → कंठ

क

(आ) सण → ______ → ______ → सीता → ______ → सूप → ______ → ______ → सोने → ______ → संगत

स

## शब्दकोडे सोडवूया.

- **खालील चौकोनातील अक्षरांमध्ये शब्दयोगी अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या, तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन शब्दयोगी अव्यये बनवा व दिलेल्या जागेत लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ती | नं | स | क | ट |
| व | ल | त | सा | ठी |
| र | स | मो | र | पु |
| न | ह | प्र | खा | ढे |
| जी | त | मा | गे | ली |
| क | प | णे | क | ड |

______ ______
______ ______
______ ______
______ ______
______ ______
______ ______



## वाचा.

- **विरामचिन्हांचा वापर करून परिच्छेद सुवाच्य अक्षरांत पुन्हा लिहा.**

मुलांनो शाळेत तुम्हांला अनेक मित्र असतात तुमची काळजी घेणारे तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत कोण बरे आहेत हे मित्र असा प्रश्न तुम्हांला निश्चितच पडेल आपल्याला फळे फुले सावली देणारे वृक्ष आपल्याला पिण्यासाठी पाणी देणाऱ्या नद्या श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील सर्व भाषिक खेळ खेळण्याची संधी द्यावी. असे विविध भाषिक खेळ स्वत: तयार करून विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा.

# ९. वाचनाचे वेड

**आशा पाटील** (जन्म-१९७६) : प्रसिद्ध लेखिका. 'आठवणींचा पाऊस', 'बिल्वदल' हे काव्यसंग्रह; 'अमृतफळ', 'आत्मनाद', 'बंटीची फजिती', 'शूर वीर', 'पाखरं', 'शेवंताबाई' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध.

सोनालीने अवांतर वाचन करावे यासाठी तिच्या आईने केलेली युक्ती कशी सफल झाली, याचे वर्णन लेखिकेने प्रस्तुत पाठात केले आहे.

आजकालच्या मुलांना वाचन म्हणजे कंटाळवाणी गोष्ट वाटते. टीव्ही, व्हिडिओ गेम्स, कॉम्प्युटर, मोबाईल या सर्वांशी त्यांची मैत्री पक्की झाली आहे. खरेतर सोनालीलाही पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तक वाचनाची बिलकूल आवड नव्हती. तिची आई अन् मोठ्या भावाला मात्र आवड नव्हे, तर वाचनाचे वेडच होते. तिच्या आईने बऱ्याच वेळा वाचनाकडे तिचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. आपल्या अभ्यासाशिवाय दररोज किमान दोन पाने अवांतर वाचावीत, असे तिचे मत होते. खूप प्रयत्न करूनही सोनालीला अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करण्याकरिता आईला यश येत नव्हते.

एकदा सुट्टीमध्ये तिच्या आईने एक गोष्टींचे पुस्तक तिच्या हातात दिले अन् तिला सांगितले, ''सोनाली, मला एका शाळेत पाहुणी म्हणून बोलवलं आहे. तिथे मुलांना मी एक गोष्ट सांगणार आहे. मला खूप काही गोष्टी माहीत आहेत; पण कोणती गोष्ट सांगू ते समजेना. या पुस्तकातली एक गोष्ट सांगावी असं वाटतंय. तू यांतली एक छानशी गोष्ट मला निवडून दे. मी तीच गोष्ट शाळेत सांगेन.''

आईला मदत म्हटल्यावर सोनालीला शाळेत बाईंनी सांगितलेले आठवले. 'आपण सर्वांना मदत केली पाहिजे. या मदतीची सुरुवात घरापासून करा. मदत करण्याने आपल्याला तर आनंद होतोच; पण दुसऱ्याचा आनंद हा आपल्याला समाधान देऊन जातो. तुम्ही घरी किंवा इतर ठिकाणी कोणकोणती मदत करता, त्याची नोंद ठेवा आणि ती दर शनिवारी दाखवा.'

सोनालीने आतापर्यंत बऱ्याच नोंदी वहीत केल्या होत्या. आईला मदत, ही एक नवीन नोंद होईल, बाईदेखील सगळ्यांसमोर आपले कौतुक करतील,



शाबासकी देतील या विचाराने तिने पटकन 'हो' म्हणून आईच्या हातातले पुस्तक घेतले.

आईने तिला दिलेल्या पुस्तकात छोट्या छोट्या कथा होत्या. नुसत्या कथांची नावे वाचून कोणती कथा निवडावी हे तिला कळेना. शेवटी तिने नाइलाजाने एक-एक करून जवळ जवळ दहा कथा वाचल्या. अवघ्या एक-दीड तासात सारे पुस्तक वाचून झाले. खरेतर प्रथम तिला हे फारच कंटाळवाणे वाटले होते; पण जसजशी ती पुस्तकातल्या कथा वाचू लागली, तसतशी तिला पुढची कथा काय आहे, त्यात काय लिहिले आहे, याविषयी उत्सुकता वाटू लागली. त्यानंतर तिने पुस्तक केव्हा संपवले, हे तिलाच कळले नाही.

कथा तर सगळ्याच आवडल्या, त्यांतली कोणती निवडावी ते समजेना. ती आईकडे गेली व आपल्या

समोरील समस्या सांगितली. मग आईने तिला प्रत्येक कथेचा थोडक्यात सारांश एका पानावर लिहिण्यास सांगितले. सोनालीला प्रथम हे काम सोपे वाटले; पण एक-दोन कथांनंतर पुढच्या कथेत काय आहे हे पटकन आठवेचना. तिने आईला 'मी पुन्हा एकदा पुस्तक वाचते' म्हणून सांगितले. खरेतर आज घरात आजी, आजोबा, बाबा, दादा, काकू, काका या साऱ्यांनाच सोनालीकडे पाहून नवल वाटत होते.

आता तिने एक पान घेतले, त्या पानावर कथेचे नाव अन् त्या कथेत काय सांगितले आहे ते थोडक्यात लिहिले. बघता बघता तिचे पान भरले होते. ती पळतच आईकडे गेली अन् तिने आईला ते पान दाखवले. आईला ते सारे पाहून तिचे खूप कौतुक वाटले. आईने तिचे घरातल्या साऱ्यांपुढे कौतुक केल्यामुळे तिचा आनंद गगनात मावत नव्हता.

शाळेत गेल्यानंतर तिने आपण काल आईला काय आणि कशी मदत केली ते सांगितले आणि सोबत एक कथाही ऐकवली. तिने आजपर्यंत कधीच अवांतर वाचन केले नव्हते. तिच्यातला हा आमूलाग्र बदल सर्वांना आनंद देणारा होता. वर्गात प्रथम बाईंनी, आईला मदत केली म्हणून अभिनंदन केले आणि नंतर तिने वर्गात एवढी छान गोष्ट सांगितली म्हणून कौतुकाने तिच्या पाठीवर शाबासकी दिली.

सोनालीला आज खूप खूप आनंद झाला होता. तिने आता घरातल्या, शाळेच्या वाचनालयातल्या अनेक पुस्तकांचे वाचन करायचे ठरवले होते. आईने सांगितल्याप्रमाणे तिने एक वही केली होती. त्यामध्ये ती आवडलेल्या ओळी किंवा एखादा प्रसंग लिहून ठेवत असे. सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी बाबांनी तिच्या वाढदिवसाला एक छानसे पुस्तक तिला भेट दिले आणि सोबत तिच्या वर्गातील साऱ्याच मुलामुलींना एकेक पुस्तक भेट स्वरूपात दिले. सोनालीला आता 'पुस्तक वाचत जा,' असे सांगण्याची गरजच उरली नव्हती.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून योग्य गतीने समजपूर्वक पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. या पाठाचे विद्यार्थ्यांकडून संवादरूपात सादरीकरण करून घ्यावे. पाठातील एखाद्या परिच्छेदाचे अनुलेखन तसेच श्रुतलेखन करून घ्यावे.

**शब्दार्थ : मन वळवणे** – तयार करणे. **नवल वाटणे** – आश्चर्य वाटणे. **आनंद गगनात न मावणे** – खूप आनंद होणे. **आमूलाग्र** – मोठ्या प्रमाणात.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सोनालीने काय करावे असे आईला वाटत होते?

(आ) सोनालीच्या घरातील सर्वांना तिच्याकडे पाहून नवल का वाटत होते?

(इ) सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या बाबांनी काय केले?

**प्र. २. खालील घटनांमागील कारणे लिहा.**

(अ) आईने सोनालीच्या हातात एक गोष्टीचे पुस्तक दिले.

(आ) आईने सोनालीला कथेचा सारांश लिहायला सांगितला.

(इ) सोनालीला आता 'पुस्तक वाचत जा', असे सांगण्याची गरज उरली नव्हती.

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

**मुलांचे अवांतर वाचनाव्यतिरिक्त मैत्री असणारे घटक**

**प्र. ४. अभ्यासाबरोबरच तुम्हांला इतर कोणत्या गोष्टी करायला आवडतात? का ते लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा व लिहा.**

(अ) सफल होणे–

(१) यशासाठी झटणे. (२) यशस्वी होणे. (३) अपयश येणे.

(आ) नोंदी करणे–

(१) लिहून ठेवणे. (२) नोंदवही लिहिणे. (३) लक्षात ठेवणे.

(इ) आनंद गगनात न मावणे–

(१) आनंद वाहून जाणे. (२) दु:खी होणे. (३) खूप आनंद होणे.

(ई) नवल वाटणे–

(१) आश्चर्य वाटणे. (२) खूप आनंद होणे. (३) नाराज होणे.

**(आ) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) आमूलाग्र (आ) शाबासकी (इ) अवांतर

**(इ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द चौकटीतून शोधून लिहा.**

(अ) बक्षीस (आ) यश (इ) गोष्ट (ई) मदत (उ) आवड.

| |
|---|
| कथा विजय<br>साहाय्य<br>रस पारितोषिक |

______________

______________

______________

______________

______________

**(ई) हात व हस्त हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. खालील शब्द वाचा व त्यांचे अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

हस्तकला, हस्ताक्षर, हस्तांदोलन, हातकंकण, हातखंडा, हातमोजे, हस्तक्षेप.

**उपक्रम :**

तुम्हांला आवडणाऱ्या विषयांची पुस्तके वाचा. वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचा थोडक्यात सारांश आपल्या वहीत लिहा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) अजय आणि विजय शाळेत पोहोचले <u>अन्</u> पावसाची रिपरिप सुरू झाली.

(आ) मला पाऊस खूप आवडतो, <u>कारण</u> मला पावसात भिजायला आवडते.

(इ) रमेश <u>व</u> रत्ना मावशीकडे पुण्याला गेले.

(ई) आम्ही खूप प्रयत्न केले <u>म्हणून</u> आम्ही जिंकलो.

(उ) बाबा रिक्षा <u>किंवा</u> बसने प्रवास करतात.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत. शिवाय, की, परंतु, म्हणजे, तरी, नि, अन् हे सर्व शब्द दोन शब्दांना किंवा दोन वाक्यांना जोडण्याचे काम करतात, म्हणून हे शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत.

**लक्षात ठेवा :** उभय म्हणजे दोन व अन्वय या शब्दाचा अर्थ संबंध असा आहे. वाक्यातील दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे, हे उभयान्वयी अव्ययाचे कार्य आहे.

- **खालील संवादातील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.**

**आई :** आपल्याकडे पाहुणे येणार आहेत, म्हणून आपण पुरणपोळी करूया.

**अंकुश :** आई, तू बटाट्याची भाजी अन् पुऱ्या कर म्हणजे मी तुला मदत करू शकेन, शिवाय स्वयंपाकही लवकर होईल. जर पाहुणे लवकर आले, तर त्यांना वेळेवर जेवायला मिळेल; पण पाहुण्यांना आवडेल ना आपण केलेला स्वयंपाक?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उभयान्वयी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

## ● आम्ही बातमी वाचतो.



### वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा...



**आदर्शनगर, ता. १६ :** दि.१५ ऑक्टोबर रोजी साधना विद्यालय, आदर्शनगर येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. आदर्शनगर परिसरातील महत्त्वाच्या चौकांत 'वाचनसंस्कृती वाचवा' या विषयावर मुलांनी पथनाट्ये सादर केली. त्याचबरोबर विद्यालयात 'उत्कृष्ट वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली. यात मुलांनी त्यांच्या आवडत्या कथा, कवितांचे वाचन केले. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील शेखर काजळे या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले. पुढील काळामध्ये वाचनसंस्कृती विकसित व्हावी, या दृष्टीने विद्यालयात विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे मुख्याध्यापकांनी या प्रसंगी घोषित केले. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने वाचन प्रेरणा दिन साजरा केला.

● **वरील बातमीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) कोणाचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो?
(२) वरील बातमी कोणत्या तारखेची आहे?
(३) वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले?
(४) कोणत्या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले?
(५) विद्यार्थ्यांमध्ये वाचनकौशल्य वाढावे, यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील, यावर गटात चर्चा करा. त्याची यादी तयार करा.

D2KHH7

### आपण समजून घेऊया.

● **खालील वाक्ये वाचा.**

(अ) असे स्थळ — जे निसर्गरम्य आहे.
(आ) आभाळ भरून आले, पण —

वरील वाक्यांमध्ये '—' हे चिन्ह आले आहे. वाक्यांमध्ये '—' हे चिन्ह दोन कारणांनी वापरतात.

(१) स्पष्टीकरण द्यायचे असल्यास.
(२) बोलताबोलता विचारमालिका तुटल्यास.

'—' या चिन्हास **अपसरणचिन्ह** म्हणतात.

**लक्षात ठेवा :** अपसरणचिन्हाची लांबी संयोगचिन्हापेक्षा जास्त असते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्यांचे श्रवण/वाचन करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन संबंधित बातम्यांचे संकलन करण्यास सांगावे. उदा., क्रीडा.

# १०. पंडिता रमाबाई

**डॉ. अनुपमा उजगरे** (जन्म-१९४९) : प्रसिद्ध लेखिका. 'सांगी', 'पश्चात' हे काव्यसंग्रह; 'चांदणचुरा'; ललितलेखसंग्रह; 'पंडिता रमाबाई', 'लक्ष्मीबाई टिळक', 'विष्णुशास्त्री चिपळूणकर' इत्यादी चरित्रात्मक लेखन तसेच महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृती कोश प्रसिद्ध.

स्वत:चे संघर्षमय आयुष्य जगत असताना इतर स्त्रियांच्या आयुष्यात नंदनवन फुलवणाऱ्या पंडिता रमाबाईंचे प्रेरणादायी वर्णन लेखिकेने प्रस्तुत पाठातून केले आहे.



कोलकाता शहरात देशभक्त आनंद मोहन यांनी स्त्रियांसाठी जी खास सभा बोलावली होती, ती भारतातील स्त्रियांची पहिली सभा होती. पंडिता रमाबाईंना त्या वेळी बंगाली भाषा येत नव्हती, म्हणून त्यांनी मायबोलीसारखा सराव असलेल्या संस्कृत भाषेतून भाषण केले. बंगालीतून त्याचा अनुवाद त्या वेळी करण्यात आला. स्त्रियांची पहिली सभा, पहिली स्त्री वक्ता व सादर करण्यात आलेला पहिलाच मौखिक अनुवाद ही त्या सभेची वैशिष्ट्ये ठरली. स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले जात असताना, एक परप्रांतातील परभाषक स्त्री महाभारतकालीन संदर्भ देऊन स्त्रियांच्या सभेत प्रबोधन करते, ही घटनाच फार आगळीवेगळी होती.

आई, वडील व बंधू यांच्या निधनानंतर एकटे जगणे किती कठीण आहे, हे अनुभवल्यावर रमाबाईंनी विवाह करण्याचे ठरवले. अतिशय विद्वान वकील म्हणून ख्याती असलेल्या बिपिनबिहारी मेधावी यांच्याशी त्या रीतसर विवाहबद्ध झाल्या. त्या वेळी त्यांचे वय बावीस वर्षांचे म्हणजे त्या वेळच्या रूढींच्या दृष्टीने फारच वाढलेले होते.

विवाहानंतर दोन वर्षांच्या आतच बिपिनबाबूंचे निधन झाले. महाराष्ट्रातील सुधारकांच्या विनंतीवरून रमाबाई आपल्या तान्ह्या मुलीला घेऊन पुण्यात आल्या. त्यांचे पहिले व्याख्यान न्यायमूर्ती रानडे यांच्या घरी झाले. तिथेच प्रत्येक आठवड्यात एकेका घरी त्यांचे व्याख्यान व्हावे असे ठरले. 'बाईमाणूस बोलते तरी कशी', हे पाहण्याची उत्कंठा प्रत्येक पुरुषाला लागली होती. 'व्याख्यानाला येणाऱ्याने आपल्यासोबत घरातल्या एका स्त्रीला आणल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही, अशी पंडिताबाईंच्या व्याख्यानांच्या निमंत्रणपत्रिकेत एक अटच घातलेली असे.' अशी आठवण आपल्या सासऱ्यांबरोबर सभेला गेलेल्या काशीबाई कानिटकरांनी लिहून ठेवली आहे.

स्त्रियांनी शिकले व शिकवले पाहिजे, त्यासाठी आपल्या मातृभाषेचे अचूक ज्ञान प्राप्त केले पाहिजे. शिक्षिका म्हणून उभ्या राहण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या पाहिजेत, अशी शिफारस त्यांनी हंटर कमिशनकडे केली.

अनाथ, अपंग, विधवा अशा स्त्रियांची सेवा करून त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी कार्य करण्याचा आपला निश्चय रमाबाईंनी पुणे, मुंबई, अहमदाबाद इथल्या पुढाऱ्यांना व धनवानांना कळवला; पण अशा कार्याची समाजाला काही गरज आहे, हा विचारच काहींना पटला नाही. एका उदार गृहस्थाने दहा हजार रुपये देऊन त्या रकमेत रमाबाईंनी त्यांचे चाळीस हजार रुपयांत होणारे काम करून दाखवावे अशी अट घातली.

'मला भारतातील सर्व स्त्रिया सारख्याच आहेत. जेथपर्यंत माझ्या शरीरात रक्ताचा एक बिंदुमात्र आहे, तेथपर्यंत आपल्या स्त्री-जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामापासून मी पराङ्मुख होणार नाही. स्त्री-जातीची सुधारणा करण्याचे व्रत मी धारण केले आहे.' रमाबाईंच्या ह्या उद्गारांवरून त्यांना एकूणच

स्त्री-जातीविषयी किती अपार प्रेम होते आणि त्यांचे दुःख दूर करण्याविषयी किती तळमळ होती, हे दिसून येते.

रमाबाईंची कन्या मनोरमा परदेशातून ब्रेल लिपी शिकून आल्यामुळे अंध स्त्रियांच्याही शिक्षणाची सोय झाली. पंडिता रमाबाईंनी 'मुक्तिमिशन'ची स्थापना केली. 'मुक्तिमिशन' मध्ये जुजबी शिक्षण देऊन मुलींना स्वावलंबी करत असतानाच रमाबाईंनी एकेक लहान उद्योग-व्यवसाय सुरू केले. केळीच्या सोपट्यापासून टोपल्या बनवणे, वाखाच्या दोऱ्या वळणे, वेताच्या खुर्च्या विणणे, लेस, स्वेटर, मोजे विणणे, गाई-बैलांचे खिल्लार, शेळ्या-मेंढ्यांची चरणी, म्हशींचा गोठा, दूधदुभते, कुक्कुटपालन, सांडपाणी-मैल्यापासून खत, भांड्यांवर नावे घालणे, भांड्यांना कल्हई करणे, हातमागावर कापड-सतरंज्या विणणे, घाण्यावर तेल काढणे, छापखान्यातील टाइप जुळवणे-सोडणे, चित्रे छापणे, कागद मोडणे-पुस्तक बांधणे, दवाखाना चालवणे, धोबीकाम... असे कितीतरी प्रकारचे उद्योग स्त्रिया करत. ही त्या काळी फारच नवलाईची गोष्ट ठरली. अडीच हजार लोक बसू शकतील असे प्रार्थनामंदिर (चर्च) बांधताना काटकसर म्हणून रमाबाईंनी त्याचा आराखडा स्वतःच तयार केला आणि डोक्यावर विटांचे घमेले वाहून बांधकामाला हातभारही लावला. कुठलेही काम करण्यात त्यांनी कधीच कमीपणा मानला नाही. श्रमप्रतिष्ठेचा धडा त्यांनी आपल्या कृतीतून आश्रमातील मुलींना नेहमीच दिला.

रमाबाईंचे आयुष्य म्हणजे संघर्षांची आणि संकटांची एक दीर्घ साखळी होती; पण त्या खचल्या नाहीत. स्त्रीचा एक व्यक्ती म्हणून विचार आणि विकास करू पाहणाऱ्या पंडिता रमाबाई ह्या सहस्रकातील एकमेव कर्मयोगिनी व सत्शील साध्वी होत्या. त्या अशा सूर्यकन्या होत्या, ज्यांच्या नशिबी स्वतःच्या तेजामुळे आयुष्यात होरपळणे आले; पण त्यांनी अनेक वाळवंटी आयुष्यांचे नंदनवन करत कित्येक काळोखी आयुष्ये उजळवून टाकली!

---

**शब्दार्थ :** **अनुवाद** – भाषांतर. **ख्याती** – प्रसिद्धी. **पराङ्मुख** – तोंड, पाठ फिरवलेला, विन्मुख झालेला. **हातभार लावणे** – मदत करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पंडिता रमाबाईंनी हंटर कमिशनकडे कोणती शिफारस केली?

(आ) पंडिता रमाबाईंना स्त्री-जातीविषयी अपार प्रेम होते, हे त्यांच्या कोणत्या उद्गारांवरून समजते?

(इ) पंडिता रमाबाई कष्टाळू व काटकसरी होत्या हे कोणत्या प्रसंगातून जाणवते?

**प्र. २. खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) पंडिता रमाबाईंचा विवाह यांच्याबरोबर झाला– [ ]

(आ) त्यांच्या मुलीचे नाव– [ ]

(इ) अंध व्यक्तींसाठी उपयुक्त लिपी– [ ]

(ई) सहस्रकातील कर्मयोगिनी– [ ]

**प्र. ३. पंडिता रमाबाईंनी मुक्तिमिशनमध्ये स्त्रियांसाठी सुरू केलेल्या लहान उद्योगांची नावे लिहा.**

प्र. ४. पंडिता रमाबाईंसाठी पाठात आलेली विशेषणे शोधा व लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

उदा., गारवा — गार, रवा, वार, गावा, वागा.

(१) आराखडा (२) सुधारक

**(आ) असे तीन अक्षरी शब्द शोधा, ज्यांच्या मधले अक्षर 'रं' आहे. त्याची यादी करा.**

उदा., करंजी, चौरंग, कारंजे.........

**(इ) खाली दिलेल्या शब्दांचे पहिले अक्षर बदलून कंसात दिलेल्या अर्थाचा शब्द बनवा.**

उदा., खजूर (कामगार) — मजूर

(१) पुस्तक (डोके) —
(२) समता (माया) —
(३) घागर (समुद्र) —
(४) कडक (रस्ता) —
(५) गाजर (पाळीव प्राणी) —
(६) प्रवास (घर) —

**(ई) हे शब्द असेच लिहा.**

स्त्रिया, संस्कृत, वक्ता, संदर्भ, विद्‌वान, ख्याती, पराङ्‌मुख, दु:ख, श्रमप्रतिष्ठा, संघर्ष, दीर्घ, सहस्रक, आयुष्य.

## खेळ खेळूया.

- खाली दिलेल्या चौकटींत म्हणी लपलेल्या आहेत, त्या ओळखा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | णा | श | त्या |
| का | ति | चा | ल |
| हा | मा | बै | रि |

| | | | |
|---|---|---|---|
| ए | भा | ना | ध |
| रा | क | ड | ध्या |
| भ | चिं | र | |

| | | | |
|---|---|---|---|
| ऐ | ज | चे | क |
| ना | का | वे | ना |
| म | रा | वे | चे |

| | | | |
|---|---|---|---|
| चो | शी | डू | शा |
| र | फा | न | न्या |
| सो | | सं | ला |

| | | | |
|---|---|---|---|
| घ | घ | ती | |
| रो | | ली | च्या |
| री | मा | | चु |

## शोध घेऊया.



- महाराष्ट्रामधील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांविषयीची माहिती आंतरजालावरून मिळवा.

- **खालील मुद्द्यांच्या आधारे अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा व त्याला योग्य शीर्षक द्या.**

सकाळची वेळ ·········· बाबांबरोबर फिरायला·········· झाडांवर बसलेले पाखरांचे थवे·········· किलबिल··········शुद्ध हवा ·········· आल्हाददायक वातावरण··········बाबांशी गप्पा मारत घराकडे परतणे ·········· दिवसभर ताजेतवाने वाटणे.

- **चौकटीत दिलेल्या उभयान्वयी अव्ययांचा योग्य वापर करून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

| परंतु |
|---|
| म्हणून |
| वा |
| तरी |
| आणि |
| किंवा |

(१) मंगल खंजिरी ······ टाळ छान वाजवते.
(२) काका आला ····· काकी आली नाही.
(३) कुंदाचा पाय मुरगळला ····· ती शाळेत येऊ शकली नाही.
(४) मला बूट ··········· चप्पल खरेदी करायची आहे.
(५) धोधो पाऊस पडत होता ········ मुले पटांगणावर खेळत होती.
(६) तुझी तयारी असो ···· नसो, तुला गावी जावेच लागेल.

**आपण समजून घेऊया.**

- **खालील वाक्ये वाचा.**



शाब्बास ! चांगले काम केलेस बाळा!



अरेरे ! फार वाईट झाले!



बापरे ! केवढा मोठा साप!



अहाहा ! पिसारा फुलवलेला मोर!

आपल्या मनात दाटून आलेल्या भावना आपण एखाद्या उद्‌गारावाटे व्यक्त करतो. वरील वाक्यांतील शाब्बास, अरेरे, बापरे, अहाहा ही **केवलप्रयोगी अव्यये** आहेत. या शब्दांमुळे आपल्या मनातील भावना प्रभावीपणे व्यक्त होतात. या शब्दांना उद्‌गारवाचक शब्द असेही म्हणतात.

- **खालील वाक्यांत कंसातील योग्य केवलप्रयोगी अव्यये घाला.**

(अरेरे, अबब, शी, चूप)
(अ) ·········· ! काय दशा झाली त्याची !
(आ) ·········· ! एक अक्षरही बोलू नकोस.
(इ) ·········· ! मला गबाळेपणा अजिबात आवडत नाही.
(ई) ·········· ! केवढा मोठा अजगर!

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना केवलप्रयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना शब्द, चित्र, चित्र व शब्द या वेगवेगळ्या स्वरूपांत अपूर्ण गोष्ट द्यावी व ती पूर्ण करून घ्यावी .

# ११. लेक

- ऐका. वाचा. म्हणा.







**अस्मिता जोगदंड–चांदणे** (जन्म–१९८४) : 'अस्मिता', 'स्वाक्षरी', 'वेदनांचे भार', 'वलय', 'भूमी', 'माय मातीचं लिंपण', 'काट्यातून उडती पंख' हे कवितासंग्रह प्रसिद्ध.

लेक घरात वावरते तेव्हा सगळे घर हसरे, प्रसन्न व बोलके होते. तिच्या हसण्या–रुसण्याने घराला घरपण राहते. लेकीच्या निरागसपणाचे सुंदर वर्णन प्रस्तुत कवितेत कवयित्रीने केले आहे.

**शब्दार्थ : आस** – इच्छा, अपेक्षा. **ऊर** – हृदय. **पर्वा न करणे** – काळजी न करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**


(अ) लेक घरात नसताना कवयित्रीची अवस्था कशी होते?

(आ) कवयित्रीने लेकीला बोलकी चिमणी का म्हटले आहे?


(इ) कवितेतील लेक केव्हा रुसून बसते?

**प्र. २. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. ३. तुमची लाडकी ताई घरात नसली, तर तुम्हांला काय वाटते, ते थोडक्यात सांगा.**

**प्र. ४. पाठ क्रमांक २ ते पाठ क्रमांक ११ यामध्ये आलेल्या नवीन शब्दांची शब्दकोशाप्रमाणे मांडणी करा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) शेवट समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

उदा., कुंदन–गोंदण, चंदन.



### वाचा.

आई म्हणते माझा छावा,
बाबांचा मी बोलका रावा,
ताई म्हणते मला राजा,
तिच्याशी खेळताना येते मजा.

आजोबांचा मी गुणांचा ठेवा,
आजी करते माझी वाहवा,
धावून करतो कामे चार,
सर्वांचा मी लाडका फार.

- **मुलगा–मुलगी एकसमान, दोघांनाही द्या सन्मान.**

## भाषेची गंमत पाहूया.

- **मराठी विलोमपद म्हणजे असे वाक्य जे उलटे वाचले तरी अगदी तसेच असते.**

उदा., (१) टेप आणा आपटे.
(२) तो कवी ईशाला शाई विकतो.
(३) ती होडी जाडी होती.
(४) हाच तो चहा.
(५) सर जाताना प्या ना ताजा रस.
(६) काका, वाचवा, काका.

तुम्हीही अशा प्रकारची वाक्ये तयार करून लिहा. पाहा कशी गंमत येते.

- **खालील चित्रे पाहून आपल्या भावना व्यक्त करणारी वाक्ये लिहा.**







- **वाचा. समजून घ्या.**

आपल्या मनात जितक्या प्रकारच्या भावना असतात, तितके केवलप्रयोगी अव्ययाचे प्रकार असतात. या विविध भावना व त्या भावना व्यक्त करणारे शब्द खालील तक्त्यात दिले आहेत.

| केवलप्रयोगी अव्यये | त्यातील शब्द |
|---|---|
| **हर्षदर्शक** | वा, वावा, आहा, ओहो, आ-हा, अहाहा. |
| **शोकदर्शक** | ऊं, ॲ:, अरेरे, अयाई, अगाई, हाय हाय, हाय. |
| **आश्चर्यकारक** | ऑ, ओहो, अबब, बापरे, अहाहा, चक्चक्, अरेच्या. |
| **प्रशंसादर्शक** | शाबास, भले, वाहवा, छान, ठीक, फक्कड, खाशी. |
| **संमतिदर्शक** | हां, जी, जीहां, ठीक, बराय, हाँ, अच्छा. |
| **विरोधीदर्शक** | छे, छट्, हॅट, ऊ:, उंहू, च, अंहं, छे छे. |
| **तिरस्कारदर्शक** | धीक्, थु:, शीड, हुडुत, हुड, हत्, छी. |
| **संबोधनदर्शक** | अरे, अगे, अहो, ए, अगो, बा, रे, अगी. |
| **मौनदर्शक** | चुप, गप, गुपचूप, चिडीचूप. |

## ● आपली समस्या आपले उपाय–२

● चित्र पाहा. संवाद वाचा.



**आई :** अरे जॉर्डन, किती हा तुझ्या कपड्यांचा ढीग?

**जॉर्डन :** आई, काय करू मी या जुन्या कपड्यांचं?

**आई :** मुळात आवश्यक आहे तेवढेच नवीन कपडे घ्यावेत. त्यांचा पुरेपूर वापर करावा.

**जॉर्डन :** अगं हो, पण आता काय करू ते सांग ना!

**आई :** यातले जे कपडे वापरण्यासाठी चांगले आहेत, ते बाजूला कर. जे तुझ्या अंगाला येत नाहीत, जे फाटले आहेत ते वेगळे वेगळे कर.

**जॉर्डन :** आई, आपण या जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करू शकतो का?

**आई :** हो, नक्कीच. त्यासाठी आपल्यात फक्त कलात्मकता पाहिजे.

**जॉर्डन :** आई, काय काय बनवता येईल गं या कपड्यांचं?

**आई :** तुला सुट्टी आहे ना आज, चल आपण दोघं मिळून बनवूया.

(आई जॉर्डनला पर्स, तोरण, पायपुसणी बनवून दाखवते.)







**जॉर्डन :** आई, किती छान झाल्यात गं या वस्तू. खूपच छान दिसत आहेत. खरंच, आपण जुन्या कपड्यांपासून वेगवेगळ्या सुंदर वस्तू बनवू शकतो. यामुळे नक्कीच जुन्या कपड्यांचा पुनर्वापर होईल.



**विचार करा. सांगा.**

- ❖ आपल्याला लहान झालेले, पण इतरांना वापरता येतील अशा कपड्यांचे तुम्ही काय करता?
- ❖ जुन्या कपड्यांचे काय काय बनवता येईल, असे तुम्हांला वाटते?
- ❖ आवश्यक तेवढेच कपडे खरेदी केल्यामुळे कोणते फायदे होतील, असे तुम्हांला वाटते?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या टाकाऊ वस्तूंपासून विविध कल्पक वस्तू तयार करून घ्याव्यात. त्या वस्तू तयार केल्यानंतर त्यांचे अनुभव वर्गात सादर करून घ्यावे.

# १२. रोजनिशी

रोजनिशी लिहिल्याने माणसाला जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी मिळते. रात्री झोपण्यापूर्वी दिवसभरातील सर्व घडामोडींची नोंद आपण रोजनिशीमध्ये करत असतो. रोजनिशी कशी लिहितात हे विद्यार्थ्यांना समजावे, त्यांनी रोजनिशी लिहावी हे या पाठामागचे प्रयोजन आहे. वैष्णवीच्या रोजनिशीचे चौथे पान रिकामे आहे. त्यांवर तुम्ही तुमची रोजनिशी लिहा.

वैष्णवीला एक नवीन छंद जडला आहे. ती नियमितपणे रोजनिशी लिहिते. तिने लिहिलेली तीन दिवसांची रोजनिशी वाचूया.

**१४ नोव्हेंबर**

आज आमच्या शाळेत 'बालदिन' साजरा करण्यात आला. यानिमित्तानं सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. शाळेतील मुलांनी पारंपरिक वेशभूषा धारण करून या स्पर्धेत भाग घेतला. विविध थोर पुरुषांची वेशभूषा धारण करून अनेक मुलांनी त्यांची प्रसिद्ध वचनं सादर केली. या स्पर्धेमध्ये मी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा केली.

या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. रमेश कोठावळे यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व विद्यार्थ्यांना बालदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना खाऊ दिला.

**१५ नोव्हेंबर**

सगळ्याच विद्यार्थ्यांना 'सुगीचे दिवस' प्रत्यक्ष बघायचे असल्यामुळे श्री. पाटीलसर आम्हांला गावशिवारात घेऊन गेले. मोत्यासारखी ज्वारी असलेली कणसं, तुरीच्या शेंगा, भुईमुगाच्या शेंगा आणि कपाशीच्या बोंडांतून डोकावणारा पांढराशुभ्र कापूस बघून मुलं आनंदी झाली.

पेरू, सीताफळ, आवळा, चिंच, बोर ही सर्व झाडं फळांनी लदबदलेली होती. फळं खाण्याच्या तीव्र इच्छेनं मुलं बोरीच्या झाडाला दगडं मारू लागली. दगडांच्या मारानं भरपूर बोरं खाली पडली. सगळ्यांनी पटपट बोरं गोळा करून त्यावर यथेच्छ ताव मारला. आंबट, गोड, तुरट अशा विविध चवींचा आस्वाद घेतला. आम्ही शिवारातून घरी आलो, तरी माझ्या जिभेवर त्या बोरांची चव रेंगाळत होती.


**१६ नोव्हेंबर**

आज माझा वाढदिवस होता. सकाळपासूनच घरातील अनेक नातेवाईकांनी, मित्रमैत्रिणींनी फोन करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. वाढदिवसाच्या निमित्तानं आम्ही आदिवासी समाज कल्याण विभागाच्या एका वसतिगृहात गेलो. त्या वसतिगृहात आदिवासी दुर्गम भागांतली मुलंमुली शिक्षणासाठी राहतात. त्या सर्व मुलांना आम्ही माझ्या वाढदिवसाच्या निमित्तानं खाऊचं वाटप केलं. आईवडिलांपासून दूर आलेल्या त्या मुलांना पाहून मला खूप गहिवरून आलं होतं. आईबाबांनी मला समजावलं. त्या सर्व मुलांकडे बघून मला शिकण्याची नवी उमेद मिळाली.

**१७ नोव्हेंबर**

आजपासून आमची दिवाळीची सुट्टी सुरू झाली.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) वैष्णवीच्या शाळेत ‘बालदिन’ कसा साजरा झाला?

(आ) शिवारामध्ये गेल्यावर मुलांनी कोणकोणती पिके व फळझाडे पाहिली?

(इ) वैष्णवीचा वाढदिवस कशाप्रकारे साजरा झाला?

**प्र. २. का ते लिहा.**

(अ) वैष्णवीच्या रोजनिशीतील कोणते पान तुम्हांला सर्वांत जास्त आवडले?

(आ) वैष्णवीला गहिवरून आले.



**विचार करा. सांगा.**

❖ रोजनिशी का लिहावी? रोजनिशी लिहिल्याने काय फायदा होईल, असे तुम्हांला वाटते?

## खेळ खेळूया.

- **खालील कंसात काही म्हणी दिलेल्या आहेत. दिलेल्या वाक्यांशी संबंधित म्हण ओळखा व लिहा.**

(अति तेथे माती, आगीतून उठून फुफाट्यात पडणे, पळसाला पाने तीनच, नावडतीचे मीठ अळणी, थेंबे थेंबे तळे साचे, कामापुरता मामा, गर्वाचे घर खाली)

(अ) फुशारकी मारणाऱ्याचा पराजय होतो.

(आ) एखाद्याकडून काम करून घेताना गोड बोलायचं आणि काम झालं, की त्याला सोडून द्यायचं.

(इ) सगळीकडे परिस्थिती समान असणे.

(ई) थोडे थोडे करून फार मोठे काम करून दाखवणे.

(उ) एका संकटातून बचावणे व दुसऱ्या संकटात सापडणे.

(ऊ) कुठल्याही गोष्टीचा अतिरेक केल्यास संपूर्ण नाश होतो.

(ए) न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली तरी ती वाईट दिसते.

D3DAS5

## नेहमी लक्षात ठेवा.

(१) संगणकाच्या स्क्रीनसमोर दीर्घकाळ बसू नये, त्यामुळे डोळ्यांवर ताण येतो.

(२) प्रत्येक वीस मिनिटांनंतर जागेवरून उठून दहा-बारा पावले फिरून यावे, त्यामुळे आपले स्नायू सुस्थितीत राहतात.

(३) संगणकावर काम करणारी व्यक्ती व संगणकाची स्क्रीन यांमध्ये योग्य अंतर असावे.

(४) स्वत:चा पासवर्ड नेहमी गोपनीय ठेवावा.

(५) सर्व इलेक्ट्रिक वायर सुस्थितीत असल्याची खात्री करावी, तसेच संगणक चालू असताना आतील भागास हात लावू नये.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

पाऊल, गरीब, चूल, माणूस, जमीन, पाटील, कठीण, फूल, सामाईक, संगीत, शरीर.

वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवते?

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार या चिन्हांपैकी कोणतेच चिन्ह नाही; म्हणजेच या शब्दांतील शेवटचे अक्षर अकारान्त आहे आणि शेवटून दुसऱ्या अक्षराला दिलेली वेलांटी किंवा उकार दीर्घ आहे.

**लक्षात ठेवा :** मराठी शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार दीर्घ लिहितात; परंतु तत्सम (संस्कृतमधून मराठीमध्ये जसेच्या तसे आलेले शब्द) शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार संस्कृतमधील मूळ शब्दाप्रमाणे ऱ्हस्व लिहितात. उदा., चतुर, मंदिर, गुण, कुसुम, प्रिय, अनिल, स्थानिक.

# १३. अदलाबदल

**पन्नालाल पटेल** (१९१२-१९८९) : प्रसिद्ध गुजराथी लेखक. विविध लघुकथा संग्रह, बालसाहित्य, एकांकिका प्रसिद्ध.

अमृत व इसाब या मित्रांमधील अतूट मैत्रीचे वर्णन प्रस्तुत पाठात केले आहे.

होळीचा सण होता. सायंकाळची वेळ होती. गावातली काही मुले निंबाच्या झाडाखाली जमली होती. एकमेकांवर धूळ उडवत खेळत होती. अमृत व इसाब या दोघांची घट्ट मैत्री होती. ते दोघेही तेथे हातात हात घालून आले व त्यांच्याबरोबर खेळू लागले. आजच शिवून आणलेले नवे कपडे दोघांनी घातले होते. दोघांचे कपडे, रंग, आकार व कापड सर्व दृष्टींनी अगदी सारखे होते. दोघेही एकाच शाळेत, एकाच वर्गात होते. दोघांची घरेही रस्त्याच्या कोपऱ्यावर समोरासमोर, होती. थोडक्यात म्हणजे, दोघा मुलांची प्रत्येक गोष्ट सारखी होती. फरक फक्त इतकाच होता, की अमृतला आईवडील होते, इसाबला फक्त वडील होते.

दोन्ही मुलं आली. खाली रस्त्यावर बसली. दोघांनी एकसारखे कपडे घातलेले पाहून एक मुलगा म्हणाला, ''अरे, अमृत, इसाब ! तुम्ही दोघं किती एकसारखे आहात !''

यावरून दुसऱ्या एका व्रात्य मुलाला एक खोडकर कल्पना सुचली. ''अरे तुम्ही दोघे कुस्ती का नाही लढत? म्हणजे तुम्हां दोघांची ताकदही एकसारखीच आहे की एकजण दुसऱ्यापेक्षा वरचढ आहे, ते तरी आम्हांला बघायला मिळेल.''

पहिल्या मुलाला ही कल्पना आवडली. तो म्हणाला, ''खरंच अमृत. तुम्हां दोघांपैकी कोण वरचढ आहे ते बघूया !''

''चला, या पुढे !'' आणखी एकजण ओरडला, ''ही नुसती गंमत आहे.''

इसाबने अमृतकडे पाहिले. अमृत ठामपणे म्हणाला, ''नाही, माझी आई मला मारील.''

त्याची भीती खरी होती. तो घरातून बाहेर पडत असताना आईने त्याला बजावले होते, ''हे बघ. नवीन कपड्यांसाठी तू खूप हट्ट धरला होतास. आता जर का तू ते मळवलेस किंवा फाडलेस तर लक्षात ठेव.''

अमृतने अईवडिलांपाशी खूप हट्ट धरला होता, हे खरे होते. इसाबला नवा शर्ट मिळणार असल्याचे कळताच त्यानेही हट्ट धरला होता, की इसाबसारखा शर्ट मिळालाच पाहिजे. आई जर नाही म्हणाली, तर बाबा काही ऐकणार नाहीत, हे अमृत पक्कं ओळखून होता; पण तो सहजासहजी हार मानणारा नव्हता. अखेर नवा शर्ट घेऊन देण्यासाठी आईने अमृतच्या बाबांना गळ घातली.

ते छानपैकी नवे कपडे घालून अमृत घरून निघाला होता, त्यामुळे कपडे खराब होतील असे काहीही करायची त्याची तयारी नव्हती. त्यातही इसाबबरोबर कुस्ती लढायची तर त्याची अजिबात इच्छा नव्हती.

त्याचवेळी एकाने अमृतचा हात पकडून म्हटले, ''चल रे, कुस्तीचा एक डाव होऊ दे !'' त्याने अमृतला मोकळ्या मैदानात खेचून नेले.

त्या मुलाच्या तावडीतून सुटायची अमृतने खूप धडपड केली आणि म्हणाला, ''हे बघ केशव, माझी कुस्ती खेळायची मुळीच इच्छा नाही. सोड मला.'' पण तो त्याला जाऊ देईना. त्याने अमृतला जमिनीवर ढकलले. बाकीची पोरे गमतीने ओरडली, ''अमृत हरला, केशव जिंकला ! केशव जिंकला ! हुर्ये, हुर्ये !''

इसाबला हे सहन झाले नाही. त्याचा पारा चढला. त्याने केशवचा हात धरून म्हटले, ''चल ये, मी तुझ्याबरोबर कुस्ती लढतो.''

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून योग्य गतीने समजपूर्वक पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. या संवादपाठाचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण करून घ्यावे. पाठातील एखाद्या परिच्छेदाचे अनुलेखन तसेच श्रुतलेखन करून घ्यावे.

केशव घुटमळला; पण बाकीच्या मुलांनी त्याला चिथावले. दोन्ही मुले परस्परांना भिडली. इसाबने पेच घालून केशवला चीत केले. आता कुठे मुलांच्या लक्षात आले, की गंमत म्हणून सुरू केलेल्या खेळाला भलतेच गंभीर वळण लागले आहे. आता केशवचे आईवडील आपल्याला रागावतील, या भीतीने सर्व मुले सैरावैरा पळून गेली. अमृत व इसाब देखील तेथून निघाले. दोघेही थोड्याच अंतरावर गेले असतील, की अमृतचे लक्ष इसाबच्या शर्टाकडे गेले. त्याचा खिसा फाटला होता. भीतीने दोघांचे पाय जमिनीला खिळले. भीतीने मुलांच्या पोटात गोळा आला. पुढ्यात काय वाढून ठेवले आहे याची त्यांना कल्पना आली. या शर्टासाठी इसाबच्या वडिलांनी सावकाराकडून पैसे कर्जाऊ घेतले होते. कापड निवडण्यात आणि शर्ट शिवून घेण्यात खूप वेळ खर्ची घातला होता.

अचानक अमृतला एक कल्पना सुचली. त्याने इसाबला एका बाजूला ओढून नेले. स्वतःच्या शर्टची बटणे काढत अमृत म्हणाला, ''चल लवकर. काढ तुझा शर्ट. हा माझा शर्ट घाल.''

''पण तुझं काय? तू काय घालणार?'' इसाबने विचारले.

''मी तुझा शर्ट घालीन,'' अमृतने उत्तर दिले. इसाब शर्टाची बटणे काढू लागला. ''शर्टांची अदलाबदल? पण त्याने काय होणार आहे? तुझे बाबा तुला मार देतील.''

''खरंय. ते मला मारतील; पण मला वाचवायला आई आहे'', अमृत उत्तरला.

इसाब घुटमळला. त्याच वेळी त्याला कुणाच्या तरी खोकण्याचा आवाज जवळून ऐकू आला. दोघा मुलांनी झटपट शर्टांची अदलाबदल केली आणि गल्लीबाहेर आली. मग सावकाश घराकडे चालू लागली.

भीतीने अमृतच्या छातीची धडधड वाढली होती; पण त्याचे नशीब चांगले होते. तो होळीचा दिवस होता. या दिवशी झोंबाझोंबी होणार हे ठरलेलेच असते. अमृतच्या आईने जेव्हा त्याचा फाटलेला शर्ट पाहिला, तेव्हा तिने फक्त कपाळाला आठ्या घातल्या आणि त्याला माफ करून टाकले. सुईदोरा घेऊन तिने त्याचा फाटलेला शर्ट शिवून टाकला.

मुलांची भीती गेली. दोघेही पुन्हा हातात हात घालून बाहेर होळी पेटवली होती ती बघायला निघाले. शर्टाची अदलाबदल केल्याचे एका मुलाच्या लक्षात आले. त्याने या दोघांच्या आनंदावर विरजण घालत टोमणा मारला, ''अस्सं! तुम्ही तुमच्या शर्टांची अदलाबदल केली आहे तर!''

आता ही गोष्ट आपल्या वडिलांच्या कानावर जाईल, या धास्तीने दोन्ही मुले आपापल्या घराकडे धावली.

इसाबचे बाबा अंगणात खाटेवर बसले होते. त्यांनी दोन्ही मुलांना हाक मारली, '' अरे, असे मित्रांपासून पळताय काय ? या इकडे, बसा माझ्यापाशी.''

त्यांनी अमृतला हाक मारली. त्याला बरोबर घेऊन थेट त्याच्या घरी गेले. त्यांनी अमृतच्या आईला हाक मारली. ती घरातून बाहेर आली. हसनभाई म्हणाले, ''भाभी, आजपासून तुमचा हा अमृत माझा मुलगा बरं का!''

ती हसत म्हणाली, ''काय झालं हसनभाई! अहो, तुम्हांला एका मुलाकडे बघायला होत नाही, तर या दोघांकडे कसे बघणार?''

''भाभी, अमृतसारखी एकच काय, अनेक मुलं असली, तरी त्या सर्वांना वाढवायची माझी आजपासून तयारी आहे.'' हसनभाई भावुकपणे, दाटून आलेल्या गळ्याने म्हणाले.

हसनभाई वहिनींना म्हणाले, ''या मुलांना गल्लीत शिरताना मी बघितलं होतं. ती काय करताहेत हे बघण्यासाठी मीही तिथे गेलो.''

हसनभाई काय सांगत आहेत ते ऐकायला शेजारपाजारच्या बायकाही तिथे जमल्या. या मुलांनी आपापल्या शर्टांची अदलाबदल कशी केली हा प्रसंग सांगायला हसनभाईंना फार वेळ लागला नाही. ते सांगून ते पुढे म्हणाले, ''इसाबनं अमृतला विचारलं,


की तुझ्या बाबांनी तुला मारलं तर? यावर अमृत काय म्हणाला ठाऊक आहे? तो म्हणाला, 'मला वाचवण्यासाठी माझी आई आहे.' किती खरं आहे! अमृतच्या उत्तरानं माझ्यात बदल केला आहे. महत्त्व कशाला आहे, हे त्याने मला शिकवलं.''

अमृत व इसाबच्या परस्परांवरील प्रेमाची गोष्ट ऐकून सर्वजण हेलावून गेले.




**शब्दार्थ :** **व्रात्य** – खोडकर. **पारा चढणे** – खूप राग येणे. **चीत करणे** – हरवणे.

## स्वाध्याय



### प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.

अमृत व इसाब यांच्यामध्ये सारख्या असणाऱ्या गोष्टी.



### प्र. २. खाली दिलेल्या वाक्यांचा योग्य घटनाक्रम लिहा.

(अ) एका व्रात्य मुलाला एक खोडकर कल्पना सुचली.

(आ) अमृत व इसाबने शर्टांची अदलाबदल केली.

(इ) गावातली काही मुले निंबाच्या झाडाखाली जमली होती.

(ई) अमृत व इसाबच्या परस्परांवरील प्रेमाची गोष्ट ऐकून सर्वजण हेलावून गेले.

(उ) हसनभाई काय सांगत आहेत ते ऐकायला शेजारपाजारच्या बायकाही तिथे जमल्या.

### प्र. ३. पुढील वाक्यांत कंसातील योग्य वाक्प्रचार लिहा.

(अ) घरी आलेल्या पाहुण्यांना बाबांनी राहण्यासाठी.................
(गळ घातली, भुरळ घातली.)

(आ) बाळू नवीन छत्री कोठेतरी विसरून आला. हे पाहून आईचा .................
(पारा चढला, कौतुक वाटले.)

(इ) रस्त्यावर भांडणाऱ्या कुत्र्यांच्या आवाजाने नीताच्या ..................
(पोटात कावळे ओरडले, पोटात गोळा आला.)

(ई) त्याची करुण कहाणी ऐकून सर्वांची मने ..................
(हेलावून गेली, हबकून गेली.)

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खाली दिलेल्या 'अ' व 'ब' गटातील शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.**

'अ' गट  'ब' गट





**(आ) खालील शब्दांतील अचूक शब्द लिहा.**


(अ) व्रात्य, वात्र्य, वार्त्य, व्रार्त्य,

(आ) कप्लना, कल्पना, कलपना, कल्प्ना

(इ) गोष्ट, गोश्ट, गोशट, गोष्ट्ट

**(इ) खालील आकृतीत 'वान' हा प्रत्यय लावून तयार झालेले शब्द दिले आहेत. हे शब्द अभ्यासा. 'करी' हा प्रत्यय लावून तयार होणारे शब्द पुढील रिकाम्या आकृतीसमोर लिहा.**






## लिहिते होऊया.

- 'माझा आवडता मित्र/मैत्रीण' या विषयावर थोडक्यात माहिती लिहा.
- सुट्टीच्या दिवशी मित्रांसोबत तुम्ही कोणकोणते खेळ खेळता?
- तुमचा आवडता मित्र/मैत्रीण यांमधील तुम्हांला कोणते गुण सर्वांत जास्त आवडतात?



## विचार करा. सांगा.


- **खालील प्रसंगी तुम्ही काय कराल?**

(१) तुमच्या मित्राने/मैत्रिणीने आज डबा आणला नाही.
(२) शाळेत पिण्याच्या पाण्याचा नळ कोणीतरी विनाकारण सुरू ठेवला.
(३) वर्गातील एका विद्यार्थ्याने वर्गात कचरा केला आहे व ते तुम्ही पाहिले.
(४) सहलीत तुमचा मित्र किल्ल्याच्या भिंतीवर नावे लिहीत आहे.

## खेळ खेळूया.


- **खाली काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांचा समानार्थी शब्द भरून कोडे पूर्ण करा.**

(१) मस्तक
(२) कचरा
(३) रात्र
(४) पाणी
(५) जनता
(६) मुलगी



- **खाली काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांचा विरुद्धार्थी शब्द भरून कोडे पूर्ण करा.**

(१) उद्योगी ×
(२) गरम ×
(३) मोठा ×
(४) जुने ×
(५) होकार ×
(६) हसणे ×



D3M6TS

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

किडा, मेहुणा, पादुका, बाहुली, महिना, पहिली, सगुणा, तालुका, भिडू, पिसू, मनुका.

**वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवते?**

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार असे कोणते ना कोणते तरी एक चिन्ह आहे आणि शेवटून दुसऱ्या अक्षरांतील इकार किंवा उकार ऱ्हस्व आहेत.

**लक्षात ठेवा :** मराठी शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ स्वरान्त असेल, तर त्या आधीच्या अक्षरातील (उपान्त्य अक्षरातील) इकार व उकार ऱ्हस्व लिहितात.

तत्सम शब्दांतील उपान्त्य अक्षरे दीर्घ असतील, तर ती संस्कृतमधील मूळ शब्दांप्रमाणेच दीर्घ लिहावी.
उदा., क्रीडा, परीक्षा, लीला, संगीता, पूर्व, भीती.

# १४. संतवाणी

- ऐका. वाचा. म्हणा.

पक्षी जाय दिगंतरा । बाळकांसी आणी चारा ।।१।।
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिल्लांपासी ।।२।।
माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापाशीं ।।३।।
वानर हिंडे झाडावरी । पिली बांधुनी उदरीं ।।४।।
तैसी आम्हांसी विठ्ठल माये । जनी वेळोवेळां पाहे ।।५।।

– संत जनाबाई

**संत जनाबाई** – मराठी संत कवयित्री. वात्सल्य हा जनाबाईंच्या भक्तीचा अनन्यसाधारण विषय आहे. आपला उत्कट भक्तिभाव व्यक्त करण्याच्या पद्धतीतून त्यांनी सुंदर अभंगात्मक काव्य निर्मिले आहे. प्रस्तुत अभंगातून आपल्या बाळावरील आईच्या प्रेमाची उदाहरणे देऊन संत जनाबाई म्हणतात, की आमची विठ्ठल माय आम्हांला अशीच सतत सांभाळत असते.

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ।।१।।
अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ।।२।।
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ।।३।।
तुका म्हणे सांगों किती । जळो तयांसी संगती ।।४।।

– संत तुकाराम

**संत तुकाराम** – मराठी संत कवी. संत तुकाराम हे महाराष्ट्रातील थोर संत होत. या अभंगातून संत तुकाराम यांनी सामान्य लोकांना भोंदूगिरीबाबत जागरूक राहण्याचा संदेश दिला आहे.

## सुविचार

- संकटांना घाबरून न जाता जो जीवन यशस्वी करतो तोच खरा पराक्रमी होय.
- मैत्री ही नात्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे.
- नम्रता हा सर्व सद्‌गुणांचा पाया होय.

D3H2VF

## ● आम्ही कथा लिहितो.

विद्यार्थ्यांनो, तुम्हांला गोष्ट ऐकायला, वाचायला, सांगायला आवडते ना? तुम्हांला गोष्ट लिहायलाही नक्कीच आवडेल. आज तुम्ही गोष्ट लिहिणार आहात. त्याचे नीट आकलन करून घ्या. कोणता प्रसंग आहे, कोण बोलत आहे, कोणाशी बोलत आहे, त्यांच्यात कोणता संवाद चालला असेल? या सगळ्यांची कल्पना करा. त्या त्या प्रसंगामधील पात्रांचा संवाद तुमच्या वहीत लिहा. अगदी तुम्हांला पाहिजे तसा. तुम्हांला कोणते शब्द वापरावे लागतील? वाक्यरचना कशी करावी लागेल? कोणता काळ वापरावा लागेल? या सर्वांचा मनाशी विचार करा. गोष्ट लिहून झाल्यावर, त्यासंदर्भात शिक्षकांशी, मित्रांशी किंवा आईबाबांशी चर्चा करा. कथा लिहून झाल्यावर त्यास योग्य शीर्षक द्या.

**प्रसंग १**

**एकदा एक हरिण जंगलाबाहेर येते. समोरून एक प्रवासी रेल्वे येत असते.**

**प्रसंग २**

**हरिण प्रवासी रेल्वे जवळ येताच तिच्याबरोबर धावायला सुरुवात करते.**

**प्रसंग ३**

**पुढे एका स्टेशनवर रेल्वे थांबते. हरिण मात्र पुढे धावत जाते.**

**प्रसंग ४**

**जंगलात जाऊन इतर सर्व प्राण्यांपुढे आपण रेल्वेला हरवले अशी फुशारकी मारते.**

**प्रसंग ५**

**कोल्ह्याला शंका येते. तो हरणाबरोबर जंगलाबाहेर येतो.**

**प्रसंग ६**

**पुन्हा हरणाची व रेल्वेची शर्यत सुरू होते. कोल्हा दोघांच्यामागे धावत जातो.**


**प्रसंग ७**

**ती रेल्वे मालगाडी असते कोठेही न थांबता पुढे पुढे जाते. हरिण दमून जमिनीवर बसते.**

**प्रसंग ८**


**मानवाने तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेली रेल्वे आपल्यापेक्षा वेगवान आहे हे हरणाच्या लक्षात येते.**


**शिक्षकांसाठी :** वरीलप्रमाणे विविध प्रसंग देऊन विद्यार्थ्यांकडून गोष्ट तयार करून घ्यावी. मुलांकडून ती गोष्ट वाचून घ्यावी.



































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५




**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

मराठी सुलभभारती इयत्ता ७ वी

₹ २८.००